cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–५७ | शनिवार दि.१६ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### काटकसरीचा सल्ला की अपयशाची कबुली ?

पश्चिम आशियातील संघर्ष, कच्च्या तेलाच्या वाढत्या किम्मती आणि जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना काटकसरीचे आवाहन केले. पेट्रोल–डिझेलचा वापर कमी करा, सार्वजनिक वाहतूक वापरा, 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करा, परदेश प्रवास टाळा आणि वर्षभर सोने खरेदी करू नका, असे त्यांनी सुचवले. राष्ट्रहितासाठी केलेले हे आवाहन असल्याचा सरकारचा दावा असला, तरी त्यावरून देशात मोठा राजकीय आणि सामाजिक वाद निर्माण झाला आहे.

# १२ रुपये ३५ पैशानं कांद्याची खरेदी सुरु–मुख्यमंत्री

सातारा । प्रतिनिधी

**राज्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव कोसळून ते प्रति किलो ५० पैशांवर आले आहेत. यामुळे कांदे फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. १५ मे) केंद्राकडून कांदा खरेदीचा निर्णय जाहीर केला. राज्यात आजपासून प्रतिकिलो १२ रुपये ३५ पैसे दराने केंद्राकडून कांद्याची खरेदी सुरु होत आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा प्राप्त होईल, असे फडणवीस यांनी सांगितले.**



### ३० जून पूर्वी कर्जमाफी निश्चित

अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय जाहीर केला. त्याची तयारी सुरु आहे. ३० जून पूर्वी आम्ही शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार आहोत. त्यासोबत ज्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्ज भरले आहे; त्यांना आम्ही प्रोत्साहन रक्कम देऊ, असा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी केला.

सातारा येथे आयोजित पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा आणि महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही माहिती दिली. यावेळी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह उपस्थित होते. आमचा कांदा उत्पादक शेतकरी प्रचंड अडचणीत आहे. अनेक शेतकरी कांद्याला १ रुपये भाव मिळत असल्याने कांदे फेकून द्यायला निघाले आहेत. यासाठी शिवराज सिंह चौहान यांना विनंती केली होती की, शेतकऱ्यांनी पिकवलेला कांदा विकत घ्या. कांदा नाशवंत आहे. त्याची खरेदी करायची आणि त्याची साठवणूक करुन पुन्हा तो बाजारात आणायचा. या सगळ्या ▶▶ पान २ वर

## सातारा गॅझेटसाठी जरांगे पाटील आंदोलन करणार

### आठ महिने उलटून गेले तरी सरकारकडून निर्णय न झाल्याने संताप

जालना । प्रतिनिधी

मुंबईच्या आंदोलनावेळी मराठा आरक्षणाचा सातारा गॅझेटचा जीआर एका महिन्यात काढतो असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्यावर आठ महिने झाले तरी काहीही कारवाई करण्यात आली नाही. मराठा आंदोलकांवरील गुन्हेही मागे घेतले गेले नाहीत, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी आपला संताप व्यक्त केला. ज्यांना कुणबी पुरावा सापडला त्यांना व्हॅलिडिटी दिली जात नाही, शिंदे समिती रेकॉर्ड शोधत नाही. देवेंद्र फडणवीसांनी



मराठ्यांचे वाटोळं केले, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी टीका केली. ते जालन्यामध्ये बोलत होते.

मराठा आरक्षणाच्या मागणीवरून पुन्हा एकदा आंदोलनाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. जालन्यात बोलताना मराठा आंदोलक नेते ▶▶ पान २ वर

## रद्द झालेली निट परीक्षा आता २१ जून रोजी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ने निट २००६ २०२६ परीक्षेची नवीन तारीख अधिकृतपणे जाहीर केली असून, आता ही परीक्षा २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. पेपरफुटीच्या गंभीर प्रकरणानंतर ३ मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यानंतर केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर ही फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला




आहे.

एनटीएकडून जारी करण्यात आलेल्या माहितीनुसार, परीक्षा देशभरात एकाच वेळी आणि कडक सुरक्षा व्यवस्थेत पार पडणार आहे. २१ जून हा रविवार असल्याने परीक्षा केंद्रांवर विशेष पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख आणि तपासणी व्यवस्था ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर परीक्षा संदर्भात अनेक अफवा आणि भ्रामक संदेश व्हायरल होत असल्याने एनटीएने विद्यार्थी आणि पालकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. केवळ अधिकृत वेबसाईट आणि अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणत्याही ▶▶ पान २ वर

## टूरची बॅग आणली, पोलिसांनी हटकले, कापडी पिशवीत घ्यावे लागले १४ दिवसांचे सामान


### भुसंपादन घोटाळा: अविनाश पाठकला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी

बीड । प्रतिनिधी

धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनामध्ये २४१ कोटी ६२ लाख रुपयांच्या वाढीव मावेजा प्रकरणात अटकेत असलेले बीडचे तात्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना शुक्रवारी न्यायालयासमोर उभे केले असता, न्यायालयाने त्यांना २९ मे पर्यंत म्हणजेच १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली.

बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची शुक्रवारी पोलीस कोठडी मुदत संपल्यानंतर न्यायमूर्ती शिंदे यांच्यासमोर उभे करण्यात आले. यावेळी सरकारी पक्ष व प्रतिवादी वकिलांनी बाजू मांडली. दोन्ही पक्षांची बाजू ऐकून न्यायाधीशांनी २९ मे म्हणजेच १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी पाठक यांना सुनावली. बीडमधून ▶▶ पान २ वर





## मुंबईत मोर्चा राजू शेट्टी, महादेव जानकरांची पोलिसांकडून धरपकड

मुंबई । प्रतिनिधी

कोकणातील आंबा, काजू उत्पादकांना पुरेशी नुकसान भरपाई देण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी (दि.१५) मुंबईतील गिरगाव चौपाटी ते वर्षा निवासस्थान धडक मोर्चाचे आयोजन केले होते. पण हा मोर्चा निघण्यापूर्वी शिवालयाबाहेर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह आंदोलक



शेतकऱ्यांची पोलिसांनी धरपकड केली. त्यांना वर्षा निवासस्थानाकडे जाण्यापासून रोखत ताब्यात घेण्यात आले. यामुळे येथे तणावाची परिस्थिती निर्माण झाली.

कोकणातील शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, अशा घोषणा आंदोलकांनी दिल्या. आम्ही ▶▶ पान २ वर

## महाराष्ट्रातील २४ आयपीएस अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या

### मंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांचे पती साकोरे नवी मुंबईचे सह आयुक्त

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य प्रशासनाप्रमाणेच आता पोलीस दलातही मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्याचा निर्णय घेतला असून, शुक्रवारी त्यांनी गृह विभाग अंतर्गत पोलीस प्रशासनात मोठ्या प्रमाणात फेरबदल केले. मुख्यमंत्र्यांनी अप्पर पोलीस महासंचालक श्रेणीतील अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. गृह विभागाने पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित केले असून त्यांना तातडीने बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत त्यामध्ये अपर पोलीस महासंचालक श्रेणीतील पदावर पदोन्नती आणि बदली झालेल्या अधिकाऱ्यामध्ये कृष्ण प्रकाश– अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन यांची अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) येथे, दत्ता कराळे–विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य मानवी हक्क आयोग येथे बदली करण्यात आली आहे. ▶▶ पान २ वर

#### बीडचे अ.ति.एसीपी सचिन पांडकर यांची धाराशिवला बदली

## प्रवचन सुरू असताना रामधन महाराजांचे हृदयविकाराने निधन




जालना । प्रतिनिधी

**प्रख्यात प्रबोधनकार आणि बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेले ह.भ.प. रामधन महाराज राठोड (वय ६५) यांचे कीर्तन सुरू असतानाच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. भक्तांना ज्ञानामृत पाजणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाचा शेवट अक्षरशः देवाच्या दारीच झाला.**

सुरूमगाव तांडा येथे महाराजांच्या भजन आणि प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. टाळ–मृदंगाच्या तालावर महाराज अत्यंत तल्लीन होऊन ईश्वरभक्तीत दंग होते. त्यांचे अमृततुल्य विचार ऐकण्यात भाविक मग्न असतानाच, अचानक महाराजांच्या छातीत तीव्र वेदना सुरू झाल्या आणि ते व्यासपीठावरच कोसळले. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून उपस्थित भाविकांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांना तातडीने रुग्णालयात ▶▶ पान २ वर

## २६ मे रोजी केरळात होणार मॉन्सूनचे आगमन

### हवामानशास्त्र विभागाचा अंदाज, २४ तासात अंदमानात दाखल



मुंबई । प्रतिनिधी

नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सून २६ मे रोजी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे हवामानशास्त्र विभागाने शुक्रवारी (ता.१५) जाहीर केले आहे. मॉन्सून साधारण १ जून रोजी केरळात प्रवेश करत असतो. मॉन्सूनच्या दीर्घकालीन आगमनाच्या वेळा लक्षात घेता यंदा मात्र ६ दिवस आधीच मॉन्सून केरळात धडकणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या अंदाजात ४ दिवसांची तफावत गृहीत धरण्यात आली आहे. दक्षिण बंगालच्या उपसागर आणि अंदमान समुद्र ▶▶ पान २ वर

### राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा अंदाज

राज्यातील अनेक भागात पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. हवामान विभागाने पालघर ठाणे, मुंबई जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज दिला आहे. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानासह वादळी पावसाचा अंदाज दिला आहे. रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात पुढील ५ दिवस पावसाला पोषक हवामान आहे. नाशिक जिल्ह्यात हलक्या सरींची शक्यता वर्तविण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात पुढील ५ दिवस पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यात ३ दिवस वादळी पावसाची काही भागात शक्यता आहे. तर त्यानंतर दोन दिवस हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेसह पावसाचाही अंदाज देण्यात आला आहे. तर धाराशिव, नांदेड आणि लातूर जिल्ह्यात पुढील ४ दिवस वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## लाडक्या बहिणींच्या खात्यात तीन हजार जमा होणार

### एप्रिलच्या हप्त्याची रक्कम जमा होण्यास सुरुवात

मुंबई । प्रतिनिधी

महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरलेली योजना म्हणजेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या एप्रिल महिन्याची रक्कम देखील पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झाली आहे. महाराष्ट्र सरकारच्यावतीनं लाडक्या बहिणींच्या खात्यात काल मार्च महिन्याची रक्कम जमा करण्यात आली होती. शुक्रवारी काही लाडक्या बहिणींच्या खात्यात एप्रिल महिन्याचे १५०० रुपये जमा झाल्याचे मेसेज येत आहेत. म्हणजेच लाडक्या बहिणींच्या खात्यात दोन दिवसात ३००० रुपये जमा करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना यामुळं मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यातील कोट्यधी लाडक्या बहिणी मार्च आणि एप्रिल महिन्याच्या हप्त्याची रक्कम कधी मिळणार याची प्रतीक्षा करत होत्या. फेब्रुवारीच्या हप्त्याची रक्कम लाडक्या बहिणींच्या खात्यात २४ मार्चला जमा करण्यात आली होती. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### आता सोमवार, शुक्रवारी फक्त वर्च्युअल सुनावणी

नवी दिल्ली: राष्ट्रीय हितासाठी वर्क फ्रॉम होम आणि ऑनलाईन बैठकांचा पुन्हा अवलंब करण्याचा सल्ला नुकताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने सोमवार आणि शुक्रवारी फक्त व्हर्च्युअल (ऑनलाईन) सुनावणी घेण्याचे आदेश शुक्रवारी (दि. १५) जारी केले. हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे मोठे संकट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आता सुप्रीम कोर्टानेही सुनावणीबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे. सुप्रीम कोर्टाच्या रजिस्ट्री सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यायालयाने आता सोमवार आणि शुक्रवारी केवळ व्हर्च्युअल सुनावणी घेण्याचे आदेश जारी केले आहेत. सध्याची गंभीर परिस्थिती पाहता सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी हा निर्णय घेतला आहे. सुप्रीम कोर्टात आतापर्यंत हायब्रीड सुनावणीची व्यवस्था होती. म्हणजेच वकिलांना प्रत्यक्ष कोर्टात हजर राहून किंवा ऑनलाईन (व्हर्च्युअल) अशा दोन्ही पद्धतींनी युक्तिवाद करता येत होता.

### महाराष्ट्रात एआय, ग्रीन डेटा सेंटर पार्कला मंजुरी

मुंबई: महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत एक मोठे ग्रीन डेटा सेंटर पार्क आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) कम्प्युट हब उभारण्यासाठी एएम इंटेलिजन्स लॅब्स प्रायव्हेट लिमिटेडसोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या प्रकल्पात १.१४ ट्रिलियन (११४ अब्ज रुपये) गुंतवणुकीचा समावेश आहे. ऊर्जा–कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक डेटा सेंटर्स उभारून मुंबईत आधुनिक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री समिती कक्षात आयोजित या कार्यक्रमाला उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, सहायक सचिव डॉ. श्रीकांत पुलकुंडवार, सहायक सचिव लक्ष्मीकांत धोके, एएम इंटेलिजन्स लॅब्सचे अध्यक्ष अनिल चामलाशेट्टी, संचालक मौर्य पायडा, उपाध्यक्ष पंकज कुमार आणि इतर अधिकारी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे राज्यात अंदाजे ८,००० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

### सीएनजी पाठोपाठ पेट्रोल–डिझेलमध्येही दरवाढ

दिल्ली: पश्चिम आशियातील भू–राजकीय परिस्थिती लक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना पेट्रोलियम उत्पादनांचा काळजीपूर्वक वापर करण्याचा सल्ला दिला होता. तसेच भविष्यात देशावर येणारे संकट टाळण्यासाठी सोने न खरेदी करण्याचे आवाहनही केले होते. त्यानंतर देशभरात त्यांची अंमलबजावणी होण्यास सुरुवात झालेली आहे. मात्र, दुसरीकडे पेट्रोलच्या किंमतीत ३.१४ रुपयांनी आणि डिझेलच्या किंमतीत ३.११ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. यासोबतच दिल्लीसह अन्य शहरांमध्ये सीएनजीच्या किमतीतही २ रुपये प्रति किलोने वाढ करण्यात आली आहे. यामुळे अगोदरच गॅस दरवाढ आणि गॅसच्या पुरवठ्यातील अनियमिततेमुळे हैराण झालेल्या जनतेवर आणखी महागाईचे चटके सहन करावे लागणार आहे. देशभरात महागाईचा भडका उडाल्याचेही पाहायला मिळत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ–उतारामुळे इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम यांसारख्या सरकारी कंपन्या तोट्यात चालल्या होत्या.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१५ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.०० क्विंटल | २,०४१ | ३,१५१ | २,३७० |
| ज्वारी/हायब्रिड :१५८.५० क्विंटल | १,९०० | ५,१५२ | २,५६८ |
| मका/लोकल: १७.५० क्विंटल | १,८२५ | १,८२५ | १,८२५ |
| तूर : १७.०० क्विंटल | ६,८०० | ७,४०० | ७,१९२ |
| उडीद : ३.५० क्विंटल | ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| बाजरी: ५९.०० क्विंटल | १,९०० | २,४०१ | २,२१२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ५,०७५ | ५,१०० | ५,०८७ |

cmyk

अग्रलेख

# काटकसरीचा सल्ला की अपयशाची कबुली?

पश्चिम आशियातील संघर्ष, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना काटकसरीचे आवाहन केले. पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, सार्वजनिक वाहतूक वापरा, 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करा, परदेश प्रवास टाळा आणि वर्षभर सोने खरेदी करू नका, असे त्यांनी सुचवले. राष्ट्रहितासाठी केलेले हे आवाहन असल्याचा सरकारचा दावा असला, तरी त्यावरून देशात मोठा राजकीय आणि सामाजिक वाद निर्माण झाला आहे. विरोधकांनी याला सरकारच्या आर्थिक अपयशाची कबुली म्हटले, तर सराफा उद्योगाने लाखो-कोट्यवधी रोजगारांच्या प्रश्नावर चिंता व्यक्त केली. या संपूर्ण वादातून एक गोष्ट स्पष्ट होते.

देशातील आर्थिक व्यवस्थेबद्दल जनतेत अस्वस्थता वाढत आहे. संकटकाळात सरकारने जनतेला सहकार्याचे आवाहन करणे चुकीचे नाही. कोरोनाच्या काळातही नागरिकांनी संयम आणि सहकार्य दाखवले होते. परंतु, कोणत्याही आवाहनाला विश्वासार्हता प्राप्त होण्यासाठी सरकारने स्वतः आदर्श घालून देणे आवश्यक असते. सामान्य नागरिकांना पेट्रोलचा वापर कमी करण्यास सांगताना सरकारी ताफे, भव्य रोड शो, जाहिराती आणि परदेश दौरे सुरूच राहतील, तर त्या आवाहनाची नैतिक ताकद कमी होते. काटकसर ही फक्त सामान्यांसाठी आणि वैभवशाली खर्च सत्ताधाऱ्यांसाठी, अशी भावना निर्माण होऊ लागली तर जनतेत नाराजी वाढणे स्वाभाविक आहे. सोने खरेदी टाळण्याच्या आवाहनाने निर्माण झालेली प्रतिक्रिया ही केवळ राजकीय नाही; ती आर्थिक वास्तवाचेही प्रतीक आहे. भारतात सोने हा केवळ दागिना किंवा गुंतवणुकीचा पर्याय नसून सामाजिक-सांस्कृतिक परंपरेचा भाग आहे. लग्नसमारंभ, सण-उत्सव आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी सोन्याचा निकट संबंध आहे. या क्षेत्राशी लाखो व्यापारी, कारागीर, घडणावळ करणारे कामगार आणि लघुउद्योजक जोडलेले आहेत. ''वर्षभर सोने खरेदी करू नका'' हा संदेश थेट या उद्योगाच्या अस्तित्वालाच धक्का देणारा ठरू शकतो. आधीच मंदी, महागाई आणि बेरोजगारीने त्रस्त असलेल्या बाजारपेठेत अशा विधानांचे परिणाम अधिक गंभीर ठरू शकतात. विरोधकांनी सरकारवर केलेली टीकाही पूर्णपणे निराधार म्हणता येणार नाही. गेल्या दशकभरात 'आत्मनिर्भर भारत', 'पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था', 'विकसित भारत' अशा घोषणांचा मोठा गाजावाजा करण्यात आला. मग अचानक जनतेला काटकसरीचे धडे देण्याची वेळ का आली? जर परिस्थिती एवढी गंभीर असेल, तर त्याबाबत सरकारने पारदर्शकपणे आर्थिक चित्र देशासमोर मांडायला हवे. संकटाचे ओझे केवळ नागरिकांच्या खांद्यावर टाकून सरकार जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेवर होणार हे निश्चित आहे. तेलाचे वाढते दर, आयात खर्च, रुपयावरील दबाव आणि महागाई यांचा फटका बसणारच. पण त्यावर उत्तर म्हणून केवळ ''कमी वापरा'' एवढाच संदेश पुरेसा नाही. सरकारने ऊर्जा सुरक्षेचे दीर्घकालीन धोरण, पर्यायी ऊर्जेचा वेगवान विस्तार, सार्वजनिक वाहतुकीची सक्षमता आणि महागाई नियंत्रणासाठी ठोस आर्थिक पावले उचलली पाहिजेत. अन्यथा जनतेला उपदेश आणि उद्योगांना अस्थिरता, एवढाच परिणाम उरेल. आज देशात सामान्य माणूस आधीच खर्च जपून करत आहे. महागाईमुळे घरगुती बजेट कोलमडले आहे. बेरोजगारीमुळे खरेदीशक्ती कमी झाली आहे. अशा वेळी जनतेला संयमाचे धडे देताना सरकारने स्वतःच्या खर्चाकडेही तितक्याच प्रामाणिकपणे पाहणे आवश्यक आहे. सरकारी जाहिराती, अनावश्यक समारंभ, राजकीय प्रचारयात्रा आणि चैनीच्या सुविधांवर अंकुश आणल्याशिवाय काटकसरीचे आवाहन जनतेला एकतर्फी वाटेल. देशहितासाठी नागरिकांनी जबाबदारीने वागणे आवश्यकच आहे; पण राष्ट्रहित ही एकतर्फी जबाबदारी नसते. सरकार, उद्योग, सत्ताधारी आणि सामान्य जनतासर्वांनी समान सहभागाने संकटाचा सामना करणे गरजेचे असते. अन्यथा ''काटकसर'' हा शब्द राष्ट्रहिताचा न राहता, सरकारच्या अपयशाचे प्रतीक बनण्याचा धोका आहे.

## बीडमध्ये जमियतुल कुरैश सह मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

बीड । प्रतिनिधी

**बीड शहरातील मोमीनपूरा भागात पोलिसांचे संरक्षण घेऊन स्वयंघोषित गोरक्षकांनी ज्या पद्धतीने कुलपं तोडली, घरात घुसले आणि दहशत निर्माण केली हा प्रकार अत्यंत निंदनीय आणि दोन समाजात तेढ निर्माण करणारा आहे. याप्रकरणी त्या दिवशी झालेली पोलीस कारवाईची चौकशी करून संबंधित स्वयंघोषित गोरक्षक यांच्यावर गुन्हे दाखल करा अशी मागणी ऑल इंडिया जमियतुल कुरैश यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे शेख मुजीब, जड नगरसेवक मोईन मास्टर, गटनेते फारूक पटेल आणि हिंदु - मुस्लिम सलोखा वाहक भागवत तावरे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे .**

बीड येथे ऑल इंडिया जमियतुल कुरैश संघटनेसह मुस्लिम समाजातील शिष्टमंडळाने शुक्रवारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली. यावेळी शेख मुजिब. गटनेते फारुख पटेल, गटनेते खुर्शीद आलम,भागवत तावरे, नगरसेवक मोईन मास्टर, नगरसेवक सादेख जमा, नगरसेवक जैतूला खान, नगरसेवक शेख रोहिल, नगरसेवक मसूद खान, नगरसेवक मोमीन मसी, नगरसेवक इलियास इनामदार, नगरसेवक वाजेद कुरेशी नगरसेवक शेख रईस, सभापती जकी सौदागर, नगरसेवक अफसर भाई, नगरसेवक शेख बिलाल, नगरसेवक अयुब खान, नगरसेवक शेख बब्बु, नगरसेवक खय्युम इनामदार, माजी नगरसेवक शेख मतीन, बरकत पठाण,सत्तार कुरेशी, फायाज कुरेशी,शाजमा खान सय्यद जुल्फेखार अली, सय्यद खाजा, वासिम बागवान, नविद इनामदार,इमरान जागीरदार,शाहेद कुरेशी नदीर कुरेशी रफिक कुरेशी, खमर कुरेशी हमीद कुरेशी, नदीर कुरेशी, माजेद कुरेशी, मोबीन शेठ आदींची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पेठ बीड पोलीसांनी मात्र दि.११मे २०२६ मध्यरात्री मोमीनपुरा भागात झालेल्या कारवाईत खाजगी तथा कथीत गोरक्षकांना सहभागी करून घेतले. पोलीसां सोबतच त्या ठिकाणी गोरक्षक पोहचले होते, त्यांनी अनेक ठिकाणी दरवाज्याची कुलुपं तोडली, घरात घुसले, दाबदडप केली. या प्रकारामुळे संबंधित कुरेशी समाज व त्या भागात राहणारे अन्य कुटूंबातील महिला व लहान मुलांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्याठिकाणी महिला, लहान मुले असतांनाही गोरक्षक मात्र त्यांच्या धुंदीत होते. एवढेच नव्हे तर त्यांनी त्याचे व्हिडीओ देखील तयार करून ते सोशल मिडियावर व्हायरल केले आहेत. सदरील प्रकार अतिशय गंभीर असून सोशल मिडियावर हे व्हिडीओ पाहून अनेकांच्या मनात पोलीस आणि गोरक्षकांविषयी प्रचंड संताप व्यक्त होऊ लागला आहे. सदरील व्हिडीओ तेढ आणणारे असून अशा प्रकारामुळे बीड मधील कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता होती. सध्या देखील हे व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत या सर्व प्रकाराची चौकशी करावी, कारवाईचे व्हिडीओ फुटेज मागवून घ्यावे आणि तथाकथीत गोरक्षकांवर कारवाई करून त्यांना कारवाईत सहभागी करून घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी. यामध्ये गोवंश हत्या बंदी कायद्याला आणि त्यास अनुसरुन होणाऱ्या कारवाईला आमचा विरोध नाही मात्र या कायद्याच्या आडुन तथा कथीत गोरक्षकांना सहभागी करुन पोलीसांनी केलेल्या बेकायदेशिर कार्यवाहीवर आक्षेप आहे. त्या अनुशंगाने या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करुन सबंधितावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## प्रेमसंबंधाच्या संशयातून फोटोग्राफरचा खून तीन आरोपींना दोन दिवस पोलीस कोठडी

अंकुश सोनवणे । घनसावंगी

अंबड तालुक्यातील रुई येथे प्रेमसंबंधाच्या कारणावरून १८ वर्षीय युवकाची धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी तिर्थपुरी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली तसेच एक आरोपी फरार झाला आहे. आज १५ मे रोजी तीन आरोपींना न्यायालयामध्ये हजर केले असता सदरील आरोपींना दोन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार यांनी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत युवकाचे नाव राजेश विष्णु कोरकाने (वय १८, रा. रुई ता. अंबड) असे आहे. तो फोटोग्राफीचे काम करत होता. दोन दिवसांपूर्वी गावातील पुनम हिच्यासोबत असलेल्या प्रेमसंबंधाच्या कारणावरुन राजेश याचा शुभम दत्ता साळे, करण दत्ता साळे आणि त्यांचे वडील दत्ता शेषराव साळे यांच्यासोबत वाद झाला होता. त्यावेळी दत्ता साळे यांनी ''तुला एक-दोन दिवसांत पाहून घेतो,'' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. गुरुवारी गावातील जिल्हा परिषद शाळेत एका विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या लग्नात राजेश हा वऱ्हाडी मंडळींना जेवण वाढण्याचे काम करत असताना अचानक तो मंडपातून बाहेर पळताना दिसला. त्याच्या मागे शुभम दत्ता साळे, करण दत्ता साळे आणि अभिषेक उर्फ मोन्या अशोक मुसळे हे तिघे धावत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी पाहिले. यावेळी करण साळे याच्या हातात कोयता असल्याचेही दिसून आले. काही वेळानंतर मारवाडी गल्लीतील एका पडीत जागेत राजेश कोरकाने हा



रक्ताच्या थारोळ्यात मृत अवस्थेत आढळून आला. त्याच्या चेहऱ्यावर, छातीवर, गळ्यावर आणि दोन्ही हातांवर धारदार शस्त्राने वार करण्यात आल्याचे निदर्शनास आले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून तिर्थपुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. फिर्यादी काशीबाई पंढरीनाथ कोरकाने यांच्या जबाबावरून दत्ता शेषराव साळे यांच्या सांगण्यावरून शुभम दत्ता साळे, करण त्ता साळे आणि अभिषेक उर्फ मोन्या अशोक मुसळे यांनी राजेशची हत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी तिर्थपुरी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला.

## पान १ वरून...

### १२ रुपये ३५ पैशानं कांद्याची

गोष्टी अडचणीच्या असतात. पण, आमच्या विनंतीला मान देऊन आजपासून महाराष्ट्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, कृषिमंत्री चौहान यांच्या नेतृत्वात १२ रुपये ३५ पैसे दराने कांदा खरेदी सुरु होत आहे. असे फडणवीस म्हणाले. कांद्याचे भाव कोसळल्याने काही शेतकऱ्यांना कांदा फेकून दिला आहे. तर भूम येथील एका शेतकऱ्याने शेतात विक्रीसाठी ठेवलेला कांदा पेटवून दिला. सातारा जिल्ह्यातील खटाव येथील एका शेतकऱ्याने कांद्याला योग्य भाव मिळत नसल्याने पाऊण एकर कांदा पीक शेतातच सोडून दिला. भाव कोसळल्याने उत्पादक शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे. त्याची दखल राज्य सरकारने घेतली आहे. दरम्यान, शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत येत्या आठवड्यात गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन साखर कारखानदारीच्या संदर्भात एक बैठक घेणार आहोत. केंद्र आणि राज्य सरकार मिळून साखर कारखानदारी आणि ऊस उत्पादक शेतकरी यांच्यावरील संकट दूर करेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

-----------

### रद्द झालेली निट परीक्षा

अनधिकृत लिंक, मेसेज किंवा सोशल मीडिया पोस्टवर विश्वास ठेवू नये, असा इशाराही देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी पुढील काही आठवडे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. तज्ज्ञांच्या मते, आता नवीन अभ्यास सुरू करण्याऐवजी रिव्हिजन, मागील प्रश्नपत्रिका आणि मॉक टेस्ट सोडवण्यावर भर द्यावा. वेळेचे योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण सराव विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे.

-------------

### सातारा गॅझेटसाठी जरांगे पाटील

मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांत टीका केली. जरांगे यांनी आरोप केला की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मराठा समाजाला जास्तीत जास्त त्रास देण्याचे काम सुरू आहे. मतं आणि नेते मराठ्यांचे लागतात, पण मराठा समाजातील मुलं मोठी होऊ नयेत, अशी भूमिका दिसते, अशा शब्दांत त्यांनी टीका केली. नेकनूर येथील घटनेचाही उल्लेख करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मुंबई आंदोलनानंतर हैदराबाद गॅझेटचा जीआर निघाल्यावेळी सरकारचे कौतुक केले होते, असं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, त्यानंतर १०८ प्रमाणपत्रांचे वितरण झाले. मात्र सातारा संस्थानाच्या गॅझेटबाबत दिलेले आश्वासन अजूनही पूर्ण झालेले नाही. आता आम्हीच पाहतो हा जीआर कसा निघत नाही, असा इशारा त्यांनी दिला. कुणबी नोंदी सापडूनही संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने अनेक मराठा कुटुंबे अडचणीत असल्याचे जरांगे यांनी सांगितले. शिंदे समितीला रेकॉर्ड शोधण्याच्या प्रक्रियेत अपेक्षित गती नसल्याने समाजात नाराजी वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. मराठा समाज न्याय मिळेपर्यंत मागे हटणार नसल्याचे स्पष्ट करत जरांगे यांनी आंदोलनाची पुढील तारीख शनिवारी जाहीर केली जाईल, असे सांगितले. आमची लेकरं ही आम्हाला सोन्यासारखी आहेत. सरकारने आणखी बळी घेऊ नये, असे भावनिक आवाहनही त्यांनी केले.

------------

### मुंबईत मोर्चा राजू शेट्टी, महादेव

प्रशासनासोबत चर्चा करण्यासाठी आलो होतो. आम्ही कसलाही गुन्हाच केलेला नाही आणि कसल्याही प्रकारचे आंदोलन केलेले नाही. आम्हाला ताब्यात घेण्याचे कारण काय? असा सवाल राजू शेट्टी यांनी केला. राजू शेट्टी आणि महादेव जानकर यांनी रस्त्यावर ठिय्या दिला. यावेळी पोलिस आणि आंदोलकांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेत डोंगरी पोलिस स्थानकात नेले. आम्ही ७० लोकांना ताब्यात घेतले आहे. आमची कृती जर तुम्हाला बेकायदेशीर वाटत असेल तर तुम्ही तुमचे म्हणणे न्यायालयात मांडा, असे पोलिस अधिकाऱ्यांनी राजू शेट्टी यांना सांगितले. या सरकारला कोकणला केवळ फार्म हाऊस करायचे आहे, असा आरोप शेट्टी यांनी केला. कोकणचा आंबा सातासमुद्रापार गेला. पण सध्या आंबा बागायतदार आर्थिक अडचणीत आहे. त्यासाठी कोकणातील आंबा उत्पादकांना घामाचे दाम मिळण्यासाठी गिरगाव चौपाटी ते वर्षा निवासस्थान असा धडक मोर्चा काढण्यात येणार होता. अवकाळी पाऊस तसेच बदलत्या हवामानामुळे यंदा आंबा, काजू पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यासाठी सरकारने जाहीर केलेली मदत तोकडी असल्याचा आरोप शेट्टी यांनी केला आहे. नुकसानग्रस्त आंबा उत्पादकांना हेक्टरी पाच लाख रुपये तर काजू उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाख रुपये मदतीची मागणी करण्यात आली आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना हेक्टरी २२ हजार रुपये मदत देण्याचे जाहीर केले आहे. पण ही मदत तोकडी असल्याचे आंबा, काजू उत्पादकांचे म्हणणे आहे.

--------------

### टूरची बॅग आणली, पोलिसांनी हटकले,

जाणाऱ्या धुळे - सोलापूर या राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनामध्ये १५४ लवाद आदेशाच्या माध्यमातून २४१ कोटी ६२ लाख रुपयाचा वाढीव मावेजा मंजूर केल्याचा ठपका तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाटील यांच्यावर ठेवण्यात आला होता. उपजिल्हाधिकारी भूसंपादन सतीश धुमाळ यांच्या फिर्यादीवरून महसूल विभागासह कंत्राटी कर्मचारी आणि काही वकील अशा दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तांत्रिक पुराव्यावरून तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचा सहभाग यामध्ये आढळून आल्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. शिवाजीनगर पोलिसांनी कोठडीची मुदत संपल्यानंतर न्यायालयासमोर उभे केले असता, न्यायालयाने त्यांना २९ मे पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या आदेशानंतर पाठक यांना येथील जिल्हा कारागृहामध्ये पाठवण्यात आले. यावेळी कारागृहात जाण्यापूर्वी पाठक यांच्या काही सहकाऱ्यांनी टूरला घेऊन जातात तशी बॅग भरून आणली होती. मात्र तेथील पोलिसांनी यावर आक्षेप घेत ही बॅग घेता येणार नाही असे सांगितले. त्यानंतर ही बॅग परत पाठवली गेली आणि एका कापडी पिशवीमध्ये पाठक यांचे कपडे व इतर साहित्य देण्यात आले. दरम्यान, भूसंपादन घोटाळ्याची व्याप्ती आता वाढत असून, याप्रकरणी अनेकांची चौकशी केली जाणार आहे. या प्रकरणांमध्ये आणखी बरेच मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

-----------

### प्रवचन सुरू असताना रामधन

नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुर्दैवाने वैद्यकीय मदत मिळण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली होती. मूळचे काकडा तांडा (जि. जालना) येथील रहिवासी असलेल्या रामधन महाराजांच्या या आकस्मिक निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे . रामधन महाराज हे केवळ कीर्तनकार नव्हते, तर बंजारा समाजातील हजारो तरुणांसाठी ते एक दीपस्तंभ होते. आयुष्यभर त्यांनी समाजाला शिक्षणाची दिशा दाखवली आणि व्यसनमुक्तीसाठी मोठे कार्य केले. ''देहाचा शेवट कधी ना कधी निश्चित आहे, पण तो सत्कारणी लागायला हवा,'' हा कीर्तनातून दिला जाणारा त्यांचा विचार त्यांनी स्वतःच्या मृत्यूतूनही सार्थ ठरवला. ज्या भगवंताचे नाव त्यांनी जन्मभर जपले.

-----------

### महाराष्ट्रातील २४ आयपीएस

विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण प्रविण पडवळ यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र येथे, लखमी गौतम(पोलीस सह आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई यांची विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई, मनोज शर्मा यांची पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), बृहन्मुंबई, सुवेझ हक यांची पोलीस सह आयुक्त (प्रशासन), महेश पाटील यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) येथे पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे. परमजीत दहिया यांची दहशतवाद विरोधी पथक (पदोन्नतीने) विशेष पोलीस महानिरीक्षकपदी, सी.के. मीना यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र,संजय दराडे यांची पोलीस सह आयुक्त, पुणे, रंजन शर्मा यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र तर सुनिल फुलारी यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग (पूर्व), राजेश प्रधान यांची पोलीस सह आयुक्त, आर्थिक गुन्हे, निशिथ मिश्रा यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण, जय कुमार यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन,संजय येनपुरे यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, व्ही.आय.पी. सुरक्षा, संजय जाधव यांचीअपर पोलीस आयुक्त, ठाणे, दिपक साकोरे यांची पोलीस सह आयुक्त नवी मुंबई, पंजाबराव उगले यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस गृह निर्माण महामंडळ आणि एस. व्ही. पाठक यांची विशेष पोलीस महानिरीक्षक (आर्थिक गुन्हे), गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे बदली करण्यात आली आहे. तसेच विनायक देशमुख यांची नियंत्रक, वैधमापन,ज्योती प्रिया सिंग यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक,अनिल कुंभारे यांची पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई, सत्य नारायण चौधरी यांची पोलीस सह आयुक्त, वाहतूक, येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

-----------

### लाडक्या बहिणींच्या खात्यात

त्यानंतर लाडक्या बहिणींना मार्च आणि एप्रिल महिन्याच्या हप्त्याच्या रकमेसाठी वाट पाहावी लागली होती. अखेर राज्य सरकारकडून १४ आणि १५ मे रोजी अनुक्रमे मार्च आणि लाडकी बहीण योजनेच्या हप्त्याची रक्कम वर्ग करण्यात आल्यानं लाभार्थी महिलांना दिलासा मिळाला आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात ३००० रुपये दोन दिवसांमध्ये जमा झाले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती सरकारनं लोकसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर सुरु केली होती. या योजनेची सुरुवात जुलै २०२४ पासून करण्यात आली आहे. तेव्हापासून दरमहा लाडक्या बहिणींच्या खात्यात रक्कम जमा केली जाते.

---------

### २६ मे रोजी केरळात होणार

तसेच अंदमान-निकोबार बेटांच्या काही भागात मॉन्सूनच्या आगमनासाठी अनुकूल हवामान असल्याचे हवामान विभागाने जाहीर केले आहे. त्यामुळे या भागात पुढील २४ तासात मॉन्सूनचे आगमन होऊ शकते. या भागात मॉन्सूनचे आगमन साधारण २० मेच्या दरम्यान होत असते. यंदाच्या जून ते सप्टेंबर या कालावधीत 'सुपर एल निनो'च्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पावसाचा प्राथमिक अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मॉन्सून कमी पाऊस झाला तर खरीप हंगाम धोक्यात येऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

-----------

## पान ६ वरून...

### बीडमध्ये रखडलेले राष्ट्रीय महामार्गाचे काम,

कार्यालयासमोरील रखडलेल्या कामांबाबत राष्ट्रीय महामार्ग विभाग व उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाच्या माहितीनुसार हा रस्ता ३० मीटर रुंदीचा असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून नॅशनल हायवे ॲक्ट १९५६ तसेच कंट्रोल ऑफ नॅशनल हायवे ॲक्ट २००२, ॲक्ट नं.१३ ऑफ २००३ नुसार आपल्या हद्दीतील रस्त्याचे काम आजपर्यंत पूर्ण का करण्यात आले नाही, याचे स्पष्टीकरण द्यावे. याशिवाय बालेपीर दर्ग्याच्या जागेची शासकीय मोजणी करण्यात आली आहे का, असा प्रश्न उपस्थित करत मोजणी झाली नसल्यास ती तातडीने करून दर्ग्याच्या हद्दीबाहेरील अतिक्रमणे हटवावीत. कर्परा नदीची मोजणी करून नदीपात्रातील अतिक्रमणे हटवावीत व दक्षिणेकडील परिसरातील नागरिकांसाठी रस्त्याची कनेक्टिव्हिटी खुली करून द्यावी. तसेच सदर रस्त्यावरील अतिक्रमणे आजपर्यंत का हटविण्यात आली नाहीत आणि रखडलेल्या रस्ता व नाली कामांची माहिती १५ दिवसांच्या आत द्यावी. रखडलेल्या रस्ता व नाली कामकाज एका महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले, नगरसेवक शुभम धूत, सावित्रीताई नितीन साखरे, मीनाताई जाधव, मीनाताई रणजितसिंह चव्हाण, भाग्यश्रीताई देशपांडे, जगदीश गुरखदे, राहुल गुरखुदे, मंगेश धोंगडे, भाग्यश्री तांबारे, पूजाताई राजाभाऊ गुजर, समीक्षा शेटे, सय्यद मुस्तफा, आदित्य माने, ज्योतीताई नंदकिशोर पिंगळे यांच्यासह भाजप, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

### जायकवाडीचा पाणीप्रश्न

व माजलगाव तालुक्यातील शेतकर्यांना सातत्याने दुष्काळाला सामोरे जावे लागते. शेतीला बारमाही पाणी मिळत नसल्याने शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जबाजारीपणा, तरुणांचे स्थलांतर, ऊसतोड मजूर, बेकारी, आरोग्य असे अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी बीड जिल्ह्यातील शेतीला जायकवाडी धरण व कृष्णा खोर्याचे पाणी मिळाले पाहिजे. यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने मागणी व आंदोलने होत आहेत. मात्र शासन या योजनांना एक रुपयाही निधी देत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. यासाठी शुक्रवारी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक देविदास चव्हाण, संतोष भारती, बाबुराव जेठे मामा, अप्पासाहेब महानोर,शामराव घुगे, भरत पवार, राहुल लोंढे, संजय जाधव, उमेश मस्के, दिगंबर भाऊ येवले, शेख वहाब, गणेश प्रभाळे, भिकू घोंगडे, हनुमंत गायकवाड, दिनेश गुळवे आदी उपस्थित होते. यावेळी शेतकर्यांनी कोकणातील १६८ टीएमसी पाणी नदीजोड प्रकल्पातून मराठवाड्याला मिळणार आहे. हे काम नियोजित वेळेत गतीने करून हे पाणी जायकवाडी धरणातून बीड जिल्ह्यातील शेतीला मिळावे, गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालवा यासाठी तातडीने सर्वे करावा, कोकणातून येणार्या १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळेल हे सांडून त्याचा प्रोजेक्ट रिपोर्ट तात्काळ तयार करावा, गेवराई तालुक्यातून जाणारा उजवा कालवा व माजलगाव धरण यांचे जायकवाडी धरणातून मिळणारे पाणी कमी केले आहे ते पूर्ववत करावे, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गतवर्षीचा पीकविमा द्यावा, शेतकऱ्यांना सरसकट व संपूर्ण कर्जमाफी तात्काळ द्यावी आदी मागण्या जिल्हाधिकारी यांना केल्या. या मागण्यांसाठी २९ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढण्याचा इशाराही दिला.

**उजव्या कालव्यातून पाणी सोडावे**

जायकवाडी धरणाचा उजवा कालवा हा गेवराई व माजलगाव तालुक्यातून जातो. या भागातील शेतकर्यांनी ऊस, फळबाग व भाजीपाला पीक घेतले आहे. सध्या उन्हाळा असल्याने शेतीला पाणी कमी पडू लागले आहे. त्यामुळे उजव्या कालव्यातून सतत पाणी सोडावे अशी मागणीही यावेळी शेतकऱ्यांनी केली.

------------

### सुतगीरणीवरील गैरव्यवहारांची उच्चस्तरीय

आणखी २३ कोटी रुपये मंजूर करण्यासाठी काही वरिष्ठ अधिकारी व राजकीय व्यक्तींना हाताशी धरून प्रयत्न सुरू असल्याचाही दावा करण्यात आला आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी विनोद बी. शर्मा यांच्या बदलीनंतर चार्ज सोडण्याच्या दिवशी उपयोगिता प्रमाणपत्रावर स्वाक्षरी घेण्यात आली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षरीबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी तथा सध्याच्या समाजकल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे यांच्याकडे तक्रार करूनही कोणतीही चौकशी झाली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची मंत्रालय स्तरावर स्वतंत्र विशेष चौकशी समिती नेमून सखोल चौकशी करावी, संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करून विभागीय चौकशी सुरू करावी, तसेच सुतगीरणीच्या मुख्य प्रवर्तक, चेअरमन आणि संचालक मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, शासनाने याची गंभीर दखल न घेतल्यास दि. २५ मे २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशाराही पीपल्स रिपाईचे जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांनी दिला आहे.

--------------

### बीड पं.स.च्या नरेगा विभागातील ११

आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. नरेगा विभागातील कारभाराबाबत वारंवार तक्रारी होत असताना जिल्हा परिषद प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. आता जिल्हा परिषद प्रशासन या अहवालावर नेमकी काय भूमिका घेते, संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केले जाते का आणि बदली प्रक्रियेला गती मिळते का, याकडे लक्ष लागले आहे.

**११ कर्मचाऱ्यांची नावे अहवालात**

गटविकास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालात एकूण ११ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यामध्ये सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून शिंदे एस.बी., कुडके ए.व्ही., तांत्रिक सहाय्यक म्हणून सरवदे ए.ए., शेरकर जी.बी., शेख आर.एम., शेख ए.एस., होगले के.एन., गवते ए.ए., अंधारे व्ही.एच. तसेच क्लार्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून सय्यद ए.के., चोरमले एम.बी. यांचा समावेश आहे.

---------

### राष्ट्रीय महामार्ग झाले; पण

लांबचा वळसा घालून दळणवळण करावे लागते. विंचरणा नदीवरील पुलास मंजुरी मिळूनही काम रखडल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे. रस्ता नसल्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजतागायत भुरेवाडीमध्ये एसटी महामंडळाची बस पोहोचलेली नाही. सार्वजनिक वाहतुकीचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. विशेषतः मुलींना शिक्षणासाठी बाहेर जाणे कठीण होत असल्याने अनेक पालकांना अल्पवयातच मुलींचे लग्न करण्याची वेळ येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. वाहतुकीची सुविधा नसल्यामुळे अनेक तरुण शिक्षणाऐवजी ऊसतोड मजुरीकडे वळत आहेत. लहान वयातच मुलांना ऊसतोडणीसाठी जावे लागत असल्याने परिसरातील शैक्षणिक दर्जा मोठ्या प्रमाणात खालावला आहे. विकासाच्या नावाखाली निवडणुकीपुरते केवळ आश्वासनांची खैरात केली जाते; मात्र प्रत्यक्षात कामांना नेहमीच दिरंगाई होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. भुरेवाडी हे पूर्णतः धनगर समाजाचे गाव असून येथे सुमारे ५८० मतदार आहेत. सौताडा ग्रामपंचायतीमध्ये गावाचे तीन सदस्य प्रतिनिधित्व करतात. तरीही अनेक वर्षांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याची साधी दुरुस्तीही केली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. ''रस्ता आणि पूलाचे काम तातडीने सुरू झाले नाही तर आगामी जिल्हा परिषद निवडणुकीवर बहिष्कार टाकू,'' असा इशारा भुरेवाडी ग्रामस्थांनी दिला आहे. आता प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ग्रामीण भागातील या गंभीर प्रश्नाकडे कितपत गांभीर्याने पाहतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

--------------

### ठाकर आडगाव सप्ताहाच्या

दिली. त्यामुळे या प्रकरणामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच गेवराई पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. गुरुवारी रात्री कलम ३०७ नुसार सात आरोपींविरुद्ध गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-------------

### विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी

या शैक्षणिक उपक्रमाचा विशेष उल्लेख केला.विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, शिक्षकांमध्ये शैक्षणिक कार्याप्रती आपुलकी निर्माण करणे आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावणे या उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात आले असल्याचे आ.धस म्हणाले. तत्कालीन कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी हा पॅटर्न संपूर्ण बीड जिल्ह्यात राबवून शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व आकलन क्षमतेत सकारात्मक वाढ झाल्याचेही त्यांनी सांगितले.पुढे बोलताना त्यांनी श्री आणि श्री योजनांच्या धर्तीवर मतदारसंघात ''आमदार श्री शाळा'' आणि ''आमदार श्री शिक्षक'' या संकल्पना राबविण्यात येणार असल्याची घोषणा केली. गुणवत्तापूर्ण शाळा, उत्कृष्ट शिक्षक आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्थांचा सन्मान करून त्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. किशोरवयीन मुला-मुलींमध्ये मोबाईलचा वाढता वापर चिंतेचा विषय असल्याचे सांगत त्यांनी पालकांना सजग राहण्याचे आवाहन केले. अभ्यासासाठी मोबाईलचा उपयोग आवश्यक असला तरी त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांचे लक्ष शिक्षणापासून विचलित करू शकतो, असे ते म्हणाले. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यात पालक विद्यार्थ्यांवर बारकाईने लक्ष ठेवतात, त्यामुळे त्या भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता राज्यात अव्वल असल्याचे उदाहरण त्यांनी दिले. त्याच धर्तीवर आष्टी विधानसभा मतदारसंघातही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधा व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल,असा शब्द त्यांनी दिला.महिलांच्या आरोग्याबाबतही त्यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली. आगामी काळात महिलांसाठी विविध आरोग्य तपासणी शिबिरे, कॅन्सर तपासणी मोहीम तसेच विविध आजारांवरील जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांचे आरोग्य सुदृढ राहणे हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसीलदार निलावाड साहेब, व्याख्याते वसंत हंकारे, गटशिक्षणाधिकारी हनुमंत गव्हाणे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक संदीप पवार, आर्टिफिशियल इंटेलिजन्स विश्लेषक विक्रांत पवार, बाजार समिती उपसभापती किरण पाटील, सय्यद अब्दुल्ला, माऊली जरांगे, संदीप पवार सर,गवृहाणे साहेब बी ई ओ,सरपंच पोपट शेलार, सुरेखा खेडकर दिलीप भराटे,आशोक जेधे, जब्बार पठाण, पत्रकार पोपट कोल्हे.आसिफ सौदागर,महेश खेगरे,जालींदर सांगळे, संजय खोटे ,शाहु टेकाळे, दादा पवार उपसरपंच, गोवर्धन सुळे, पंडित मानमोडे,रोहन मानमोडे,बंडु गाडे,राम सानप,बी टी खाडे सर,बाळु घुले,बाळु काका शिंदे,हानुमंत सोडंगे,यांच्यासह विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------

### बीड पोलीस दलाचा 'फिटनेस'

पोषक घटकांची माहिती दिली. वजन नियंत्रण: व्यस्त दिनचर्येत वाढत्या वजनावर कसे नियंत्रण मिळवावे, याचे तंत्र सांगितले. जीवनशैली: पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीनुसार आहार सवयींमध्ये कोणते बदल करावेत, याचे सविस्तर मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्य: शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य आणि तणाव व्यवस्थापनाबाबतही त्यांनी मोलाचे सल्ले दिले. उत्स्फूर्त प्रतिसाद कार्यक्रमादरम्यान उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. आहार आणि व्यायामाबाबत अनेक प्रश्न विचारून कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला. या उपक्रमामुळे पोलीस दलामध्ये आरोग्याप्रती जागरूकता निर्माण झाली असून, भविष्यात अधिक सक्षम, ऊर्जावान आणि कार्यक्षम पोलीस दल घडवण्यास याची मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

-------------

### वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या

पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विष्णु काकडे, बाळु नागरगोजे, आदिनाथ मुंडे, फुलचंद जाधव, त्रिंबक कुडके, पोलीस हवालदार चालक संतोष हारके, पोलीस चालक अंमलदार दत्ता कदम, नगर पालिका कर्मचारी शरद खुपसे, विकी दागड, लखन तुसांबड, अविनाश डुलगज, महेश खुपशे, किरण भिसे, राम रोकडे, पवन लाहोट आदींनी या संयुक्त कारवाईमध्ये सहभाग नोंदविला. नगर पालिका व जिल्हा वाहतुक प्रशासनामार्फत या वर्षातील ही तिसरी मोठी कारवाई करण्यात आली असून यापुढेही कारवाई चालूच राहील असे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी आवाहन केले आहे. या कारवाईमुळे शहरातील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

---------------

### गेवराई पोलिसांनी २४ तासांत

'हिरो पॅशन' दुचाकी जप्त करण्यात आली आहे. या पथकाने केली कारवाई: ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या आदेशानुसार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल खटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, दिलीप सरवदे, अमोल सोनवणे, ऋषिकेश पोटे, आरेफ बागवान आणि विनोद कुटे यांचा सहभाग होता.

----------

## सचिन पांडकर यांची बदली

बीड । प्रतिनिधी

**मागील तीन वर्षांपासून बीड जिल्ह्यात कर्तव्यदक्ष अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले सचिन पांडकर यांची अखेर बदली करण्यात आली आहे. त्यांची धाराशिव येथे अप्पर पोलीस अधीक्षक पदावर नियुक्ती झाली असून, त्यांच्या जागी बीडमध्ये कोणत्या अधिकाऱ्याची नियुक्ती होणार याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

बीडमध्ये रुजू होण्यापूर्वी सचिन पांडकर यांनी मुंबई येथे मानवी हक्क अभियान विभागात पोलीस अधीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्यानंतर तीन वर्षांपूर्वी त्यांची बीड जिल्ह्यात बदली झाली होती. या काळात जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेच्या अनेक संवेदनशील घटनांमध्ये त्यांनी संयमाने आणि प्रभावीपणे परिस्थिती हाताळत प्रशासनाला स्थैर्य दिले.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.१६ मे २०२६




## शांताबाई सर्जे यांचे निधन

माजलगाव: तालुक्यातील मोठेवाडी येथील वारकरी संप्रदायातील शांताबाई प्रल्हादराव सर्जे यांचे दि.१४ मे गुरुवार रोजी पहाटे १:०० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७६ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर दि. १४ मे गुरुवार रोजी सकाळी ९:०० वाजता मोठेवाडी येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती,एक मुलगी,दोन मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे.गावातील प्रतिष्ठीत शेतकरी सुभाष सर्जे व हनुमान सर्जे यांच्या त्या आई होत.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य

## नगर परिषदेकडून परळीत मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा प्रदान ; आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते जागा हस्तांतरित !

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरात मराठा भवन उभे राहावे अशी गेल्या अनेक वर्षांपासून ची सकल मराठा समाजाची मागणी होती. ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदे कडून मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा देण्यात आली आहे. स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधत आज माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण करत ही जागा मराठा भवनसाठी हस्तांतरित करण्यात आली आहे.

वैद्यनाथ मंदिर परिसरात नंदागौळ रस्त्यावर वेताळ मंदिराच्या बाजूला असलेली २८ गुंठे जागा नगरपरिषदेकडून मराठा भवनसाठी नियोजित करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून परळी मध्ये मराठा भवन असावे अशी मराठा समाजाची आग्रही मागणी होती. आता मराठा भवनसाठी ही जागा हस्तांतरित करण्यात आली आहे.लवकरात लवकर सुसज्ज मराठा भवन उभे राहील अशी भूमिका मराठा समाज बांधवांनी व्यक्त केली. या अनुषंगाने आज संबंधित ही २८ गुंठे जागा माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते हस्तांतरित करण्यात आली. यावेळी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन व नियोजित मराठा भवनच्या नाम फलकाचे अनावरण आ.धनंजय मुंडे, नगराध्यक्ष सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, न. प. गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक व्यंकटेश शिंदे, श्रीकृष्ण कराड, नितीन बागवाले, अनंत इंगळे, प्रा.शंकर कापसे, देवराव लुगडे, नितीन शिंदे, सेवकराम जाधव, उत्तम माने, उत्तम मोरे, इंजि. संजय देशमुख, राजेश ठोंबरे शिवाजी देशमुख, बाबा शिंदे, महादेव गंगणे, दिलीप माने, वैजनाथ सुरवसे, सचिन मराठे,प्रल्हाद सुरवसे, शरद चव्हाण, गिरीश भोसले, डॉक्टर प्रा.पी.एल.कराड, राजेंद्र सोनी, रमेश चौंडे,




विजयकुमार खोसे ,न. प. उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, नगर अभियंता ढवळे आदींसह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परळीत देखणे मराठा भवन उभे राहील असा विश्वास मराठा समाज बांधवांनी व्यक्त केला. मराठा भवनसाठी ही जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल सकल मराठा समाजाच्या वतीने आमदार धनंजय मुंडे व नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. सकल मराठा समाजाच्या वतीने परळी नगर परिषदेचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

मराठा भवन मध्ये काय आहे प्रस्तावित?

दरम्यान,सकल मराठा समाजाच्या वतीने परळी येथे उभारण्यात येणाऱ्या मराठा भवन मध्ये समाज उपयोगी उपक्रम राबवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुला मुलींचे वसतीगृह, शिकवणी क्लासेस, अभ्यासिका, नोकरी मार्गदर्शन केंद्र आदी विद्यार्थी कलागुण विकसित करण्यासाठीचे उपक्रम या भवन मधून राबवण्यात येणार आहेत.

उद्योग, व्यवसाय मार्गदर्शन, व्यवसायातील बारकावे, येणारी आव्हाने, उद्योजक, व्यावसायिकांचे परिचय मेळावे आदी आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वधू-वर परिचय मेळावे, सामूहिक विवाह कार्य, शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक, सामाजिक ,व्यावसायिक यासह अनेक विषयावर प्रबोधन मार्गदर्शन मिळावे आयोजित करण्यासाठी मराठा भवन उपयुक्त ठरणार आहे. सर्व गुणसंपन्न पिढी घडविण्याच्या दृष्टिकोनातून ही वास्तू एक महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याचा संकल्प मराठा भवनच्या उभारणीत करण्यात आलेला आहे.

## आष्टीत दोन कोटींच्या अत्याधुनिक सार्वजनिक अभ्यासिकेचे आ.धस यांच्या हस्ते भूमिपूजन

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व दर्जेदार अभ्यास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आष्टी नगरपंचायतच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या दोन कोटी रुपये निधीच्या अत्याधुनिक सार्वजनिक अभ्यासिकेचे भूमिपूजन गुरुवारी आ.सुरेश धस यांच्या हस्ते पार पडले.



ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षा, प्रशासकीय सेवा तसेच विविध शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत असले तरी त्यांना अभ्यासासाठी आवश्यक सुविधा व पोषक वातावरण उपलब्ध होत नाही. ही बाब लक्षात घेऊन आधुनिक सुविधा, शांत वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार सुसज्ज अशी सार्वजनिक अभ्यासिका उभारण्यात येणार असल्याचे यावेळी धस यांनी सांगितले.तसेच पुढे बोलताना या अभ्यासिकेमध्ये विद्यार्थ्यांना स्वतंत्र अभ्यास व्यवस्था, आधुनिक सुविधा तसेच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार असून त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणे दर्जेदार अभ्यास सुविधा आपल्या तालुक्यातच मिळणार असल्याचेही धस शेवटी म्हणाले.यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त करत या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळण्यासोबतच ग्रामीण भागातील युवकांना स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त केली.याप्रसंगी माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,नगरसेवक सुरेश वारुंगुळे,भारत मुरकुटे,शरीफ शेख, ज्ञानदेव राऊत, इंजिनीयर शिरसाट आदी उपस्थित होते.

## बबनराव आंधळे यांना उत्कृष्ट सामाजिक कार्य गौरव पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

दिनांक १५ ५ २०२६ पद्मपाणि राज्यस्तरीय सामाजिक कार्य गौरव पुरस्कार २०२६ ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक बबनराव आंधळे यांना जाहीर झाला आहे रविवार दिनांक १७ मे रोजी दुपारी दोन वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी समाजासाठी केलेले उल्लेखनीय कार्य निस्वार्थ सेवा आहे सामाजिक प्रश्नावर सातत्याने घेतलेली भूमिका तसेच जनसामान्याच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी केलेल्या संघर्षाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी विविध आंदोलने ओबीसी साठी लढा विद्यार्थ्यांचे प्रश्न ऐरणीवर आणून ते सोडवण्याचा प्रयत्न शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी आंदोलन मोर्चा इत्यादीच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत सामाजिक बांधिलकी जपत शिक्षकासाठी त्यांनी भीक मांगो आंदोलनातही सक्रिय सहभाग



नोंदवला गावामध्ये गेली २५ वर्षापासून ते ग्रामपंचायतचे सदस्य आहेत गावांमध्ये ग्रामपंचायत हद्दीमध्ये मुलगी जन्मल्यानंतर तिच्या नावाने ते दहा हजार रुपयाची एफ डी करतात असे विविध उपक्रम ते सतत राबवत असतात त्यांच्या या धाडसी आणि जनहिताच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तनाची नवी दिशा निर्माण होत असून अनेक तरुणांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहे संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान बार्शी रोड बीड या ठिकाणी डॉ.संजय तांदळे यांच्या प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्रक्रिया देताना त्यांनी सांगितले की समाजासाठी केलेल्या कामाची खरी पावती आज मला मिळाली आहे समाजाकडून मिळणारा सन्मान हा खूप मोठा असतो मला मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी अभिमान तर आहेच परंतु या समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी हा एक आदर्श ठरणार आहे हा पुरस्कार म्हणजे माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे यासाठी पद्मपाणि प्रतिष्ठानच्या आयोजक व संपूर्ण टीमचे मी मनःपूर्वक आभार मानतो हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्राध्यापक बबनराव आंधळे यांचे सर्व जिल्ह्यांमधून सर्व तरातून अभिनंदन होत आहे

## रविवारी आष्टीत भव्य पशुसंवर्धन व दूध उत्पादन वाढ मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांसाठी दूध उत्पादन वाढ, पशुसंवर्धन व्यवस्थापन आणि आधुनिक डेअरी व्यवसायाबाबत अत्याधुनिक मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने आष्टी तालुका दूध संघ मर्यादित, आष्टी यांच्या वतीने भव्य पशुसंवर्धन व दूध उत्पादन वाढ मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर शनिवार दि. १७ मे २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता मोरेश्वर मंगल कार्यालय आष्टी येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात पंजाब येथील दुग्ध व्यवसायिक व पशुखाद्य विशेषज्ञ श्री. संदीप सिंग, डेअरी फार्मर, इन्फ्लुएन्सर, प्रशिक्षक व सल्लागार श्री. हरप्रीत सिंग तसेच महादंग मुंबईचे संचालक श्री. रणजित देशमुख हे विशेष मार्गदर्शन करणार आहेत. शिबिरात कमी खर्चात अधिक दूध उत्पादन, जनावरांचे संतुलित आहार व्यवस्थापन, पशुखाद्याचे योग्य





नियोजन, आधुनिक डेअरी व्यवस्थापन तंत्रज्ञान, जनावरांचे आरोग्य व लसीकरण तसेच डेअरी व्यवसायातून अधिक आर्थिक उत्पन्न यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या कार्यक्रमास मराठवाडा भूषण आ.श्री. सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.तालुक्यातील सर्व शेतकरी, दुग्धव्यवसायिक व पशुपालक बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आष्टी तालुका दूध संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पाणी-स्वच्छतेची भिक नको परंतु मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

बीड : बीड शहरातील वाढत्या मोकाट कुत्र्यांच्या त्रासाविरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१५ शुक्रवारी नगरपरिषद कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. बालकांवर होत असलेल्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नगरपरिषद प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध करण्यात आला. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात श्रेयवादावरुन सुरू असलेल्या कलगीतुरा आणि मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष याबद्दल तिव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

पाणी, स्वच्छता आदी मूलभूत सुविधा दिल्या नाहीत तरी चालेल, पण आधी बालकांवर होणारे मोकाट कुत्र्यांचे हल्ले थांबवा,'' अशी संतप्त घोषणाबाजी आंदोलकांनी केली. यावेळी नगरपरिषद प्रशासनाने केवळ कागदोपत्री नसबंदी मोहीम न राबवता प्रत्यक्षात कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणावी व शहरातील मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. मुख्याधिकारी नगरपरीषद यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,सय्यद सादेक , रामधन जमाले, डॉ.संजय तांदळे, बाजीराव ढाकणे आदी सहभागी झाले होते. बीड शहरात मोकाट कुत्र्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. चौकाचौकात कुत्र्यांच्या टोळ्या दिसत असून त्या दुचाकीस्वारांचा पाठलाग करत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

## बीड बायपासला सोमवारी शेतकरी करणार रास्ता रोको!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरा लगत असलेल्या बीड बायपास वरील इमामपूररोड येथील सर्विस रोड व स्लिप रोड ६०० मीटर वाढवण्या संदर्भात वारंवार पत्र व्यवहार करूनही काम न झाल्यामुळे बीड बायपासला सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. रस्ता रोको करण्याचा शेतकऱ्यांचा निर्धार करण्यात आला आहे.

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ हा अतिशय चांगल्या दर्जाचा रस्ता सन २०१९-२० मध्ये बी.ओ.टी. तत्वावर पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी हा रस्ता करत असतांना जुना सोलापूर-धुळे-मांजरसुंबा येथुन येणारा रस्ता छत्रपती संभाजी राजे चौक ते इमामपूर रोड इथपर्यंत रोडची उंची जास्त आहे व संबंधीत क्षेत्रात रोडच्या दोन्ही बाजुने शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत, त्या रोडची उंची असल्यामुळे शेती करता येत नाही. सध्या इमामपूर रोडला स्लिप रोड व सींस रोड मंजूर असून त्याचे काम चालू आहे, तसेच छत्रपती संभाजी राजे चौक बार्शी रोड येथे पण स्लिप रोड व सर्व्हस रोड मंजूर असून त्याचे पण काम चालू आहे. याच रोडवर समनापूर कडे जाणारा २० फुटाचा रस्ता आहे, इमामपूर रोड ते छत्रपती संभाजी राजे चौक या स्लिप रोडला जर ६०० मीटर आंतर वाढवले तर शेतकऱ्यांना शेती करण्यास व कोल्हारवाडी, समनापूर, इमामपूर, शिंदे वस्ती या गावांना याचा फायदा होईल. यासाठी वारंवार या संदर्भात पत्र व्यवहार करून सुध्दा यावर लक्ष दिले नाही, म्हणून या परिसरातील सर्व शेतकरी सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता बीड बायपास वरील संबंधीत जागेवर रस्ता रोको करणार आहोत. याबाबत क्षेत्रीय अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण नागपुर, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, पोलीस निरीक्षक साहेब, पोलीस स्टेशन बीड ग्रामीण यांना निवेदन देण्यात आले असून या निवेदनावर ॲड. सुभाष राऊत, वामन लिंबाजी शिंदे, दिगंबर तुलसीराम शिंदे, अंकुश तुळशीराम शिंदे, मच्छिंद्र बाबुराव वाणी, रवींद्र मच्छिंद्र माने, जयदीप पांडुरंग पवार, भगवान लिंबाजी शिंदे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पोस्ट कार्यालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर द्या;बीड शहर बचाव मंचाची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाने आज बीड मुख्य पोस्ट कार्यालयाचे पोस्टमास्टर यांची भेट घेऊन विविध जनहिताच्या मागण्यांचे निवेदन सादर केले. पोस्ट कार्यालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता, त्यांच्या सोयीसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

खाजगी तसेच सहकारी बँकांमधील आर्थिक गैरव्यवहार आणि दिवाळखोरीच्या घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास पुन्हा एकदा शासकीय पोस्ट कार्यालयांकडे वाढताना दिसून येत आहे. पोस्टाच्या विविध बचत योजनांमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढल्याने कार्यालयांमध्ये मोठी गर्दी होत असून,




विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असल्याची बाब मंचाच्या पाहणीत निदर्शनास आली. या पार्श्वभूमीवर बीड शहर बचाव मंचाने पोस्ट प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या सर्व पोस्ट कार्यालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करावेत. महिला व महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठीही विशेष सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व पोस्ट कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची तात्काळ व्यवस्था करावी. यावेळी बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीनजी जायभाये, माजी राष्ट्रवादी सेवा दल जिल्हाध्यक्ष पाशाभाई शेख, पत्रकार शाम मार्कंडे आदी उपस्थित होते. पोस्ट विभागाच्या अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी पोस्ट प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## तेली समाज गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्काराचे आयोजन

बीड

जय संताजी प्रतिष्ठान, जिल्हा बीडच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार समाज भुषण तथा अखिल भारतीय तैलिक साहु महासभा राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री जयदत्तजी (आण्णा) क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता १० वी, १२ वी मधील ज्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ७०% पेक्षा जास्त गुण आहेत, अशा विद्यार्थ्यांनी गुणपत्रक झेरॉक्स, पासपोर्ट फोटो व पालकाचा पत्ता, संपर्क क्रमांक देवून आपले नाव नोंदणी करावी. तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी, खेळाडू व इतर क्षेत्रात सन २०२५-२६ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी पदविका, प्राविण्य प्राप्त केली अशा विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या समाजातील तालुका निहाय व्यक्तिंशी संपर्क करून आपल्या नावाची नोंदणी करावी. तालुका निहाय संपर्क प्रमुखांची नावे पुढीलप्रमाणे बीड तालुक्यातील रामेश्वर पवार , शिवलिंग क्षीरसागर , उमेश पवार, परमेश्वर धारकर, मुरलीधर राऊत, राधाकिसन पेंढारे, देविदास एकशिंगे, अरूण राऊत, महादेव लोमटे, प्रशांत महाराज क्षीरसागर, गेवराई तालुक्यातील कैलास टोणपे, भागवत राऊत, माजलगाव तालुक्यातील अशोक धारक, जगदीश साखरे संतोष वाघमारे, वडवणी तालुक्यातील गणेश क्षीरसागर, अंकुशराव पेशवे, धारूर तालुक्यातील ज्ञानेश्वर शिंदे, महारुद्र इंगळ , परळी तालुक्यातील मधुकर शिंदे, अनिल बेंडे, अंबाजोगाई तालुक्यातील रामेश्वर व्यवहारे, बाळासाहेब ठमके, बाळासाहेब राजमाने , केज तालुक्यातील मयुर राऊत, पाटोदा तालुक्यातील नवनाथ साळुंके , सचिन शिंदे , शिरूर (कासार) तालुक्यातील त्ता शिंदे, रविंद्र राऊत, आष्टी तालुक्यातील अनिल सूर्यवंशी तरी वरील समाजातील व्यक्तींकडे संपर्क करून आपले शैक्षणिक कागदपत्रे देऊन सहकार्य करावे.

cmyk

# कांदा व लसूण पिकांच्या संशोधनामध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर आवश्यक

## कांदा लसूण वार्षिक बैठकीत कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचे प्रतिपादन

राहुरी । प्रतिनिधी

राहुरी महाराष्ट्रामध्ये कांदा पिकातील ७५% क्षेत्र हे महात्मा फुले कृषी विद्यापीठाने संशोधित केलेल्या कांद्याच्या फुले समर्थ या वाणाखाली असून रब्बी हंगामासाठी फुले स्वामी हा वाण प्रसारित करण्यात आला आहे. कांदा व लसूण या पिकांमधील निर्यातक्षम वाणासाठी रंग, आकार व टिकवणक्षमता यावर अधिक काम करण्याची गरज आहे. आपल्याला काटेकोरपणे खते व औषधांचा वापर करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठात कांदा आणि लसूण पिकांवरील वार्षिक बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. खर्चे बोलत होते. याप्रसंगी डॉ. के. ई. लवांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन केंद्राचे माजी संचालक डॉ. विजय महाजन व नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे माजी सहाय्यक महासंचालक डॉ. विक्रमादित्य पांडे उपस्थित होते.

डॉ. खर्चे म्हणाले, कांदा पिकाच्या अधिक उत्पादनासाठी खतांचा अचूक वापर व जमिनीची




सुपीकता वाढविणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. ड्रोन तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कांदा पिकामध्ये खते व औषधे फवारणीचे तंत्र विकसित करावे लागेल. डॉ. लवांडे म्हणाले, उत्पादन करताना प्रत्येक वाणांनुसार दर्जा, एकसारखा आकार व रंग यावर भर द्यायला हवा. निर्यातक्षम वाणांसाठी प्रोटोकॉल तयार करणे, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी यांत्रिकीकरणाचा वापर वाढविणे, साठवणुकीदरम्यान नुकसान कमी करणे यासाठी एआयचा वापर या गोष्टींवर भर देणे गरजेचे आहे. कांद्याचे जास्त उत्पादन होणे हा काही गंभीर प्रश्न नाही परंतु जास्त उत्पादनाचे नियोजन करायला हवे. निर्यात किती करायची व पुढील हंगामासाठी बियाणे म्हणून वापर किती करायचा या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. डॉ. विक्रमादित्य पांडे म्हणाले, बियाणे उत्पादन कार्यक्रम तसेच बियाणे संवर्धन कार्यक्रम यावर जास्त भर द्यायला हवा. बिजोत्पादनाचे व्यापारीकरण करण्यासाठी विविध कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करायला हवेत जेणेकरून कांदा बियाण्याची उपलब्धता मोठ्या प्रमाणात होईल. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. राम दत्ता यांनी प्रकल्प संचालकांचा अहवाल सादर केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले. या दोन दिवसीय बैठकीमध्ये अनुवांशिक संसाधने आणि पीक सुधारणा, पीक उत्पादन व पीक संरक्षण या विषयांवरील तांत्रिक चर्चासत्रे होणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र क्षीरसागर यांनी तर आभार डॉ. बी. टी. पाटील यांनी मानले. राहुरी कृषी विद्यापीठात आयोजित बैठकीत कुलगुरू डॉ. खर्चे यांनी मार्गदर्शन केले.

## उन्हाळी पिकांसाठी प्रभावी सिंचन व्यवस्थापन



उन्हाळी पिकांसाठी पाण्याचे योग्य नियोजन आणि सिंचन व्यवस्थापन हे भरघोस उत्पादनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. उन्हाळ्यात बाष्पीभवनाचा वेग जास्त असल्याने आणि तापमान वाढल्यामुळे पिकांना पाण्याची गरज सतत भासते.

उष्ण हवामांचा अंदाज लक्ष्यात घेता उन्हाळी भाजीपाला व फळबागांना शक्यतो सायंकाळी ओलीत करावे, तसेच पिकामध्ये अच्छादनाचा वापर करावा. उन्हाळी पिकातील जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी शेतात गवताचे आच्छादन करावे व ठिबक सिंचनाचा अवलंब करावा. फळपिकांमध्ये शक्यतो खुरपणी करुन घ्यावी व बोर्डोपेस्ट खोडांना लावावे. पिकांना पाणी शक्यतो रात्री द्यावे व उन्हाळी पिके, भाजीपाला व फळबागांमध्ये सूक्ष्म सिंचनाचा (ठिबक व तुषार सिंचन) उपयोग करून पाण्याची बचत करावी. जमिनीची खोल नांगरट करावी त्यामुळे जमिन चांगली तापुन त्यामधील जिवजंतुचा नाश होवुन खरीप पिकातील तणांचे प्रमाण, किड व रोगाचे प्रमाण नियंत्रणात राहण्यास मदत होते.जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी भाजीपाला व फळ झाडांमध्ये मल्चिंग करावी. भाजीपाला पिकाला आवश्यकतेनुसार सूक्ष्म सिंचनाद्वारे पाणी देणे. फळ पिकांमध्ये फळे पोसण्यासाठी बोरॉन १.५ ग्राम, कॅल्शिअम ०.७५ ग्राम, मॅग्नेशीअम ३ ग्राम प्रती लिटर पाण्यातून फवारावे. साठवण करावयाच्या कडधान्यांचे किडीपासून संरक्षण करण्यासाठी ३ ते ५ मि.ली. एरंडेल/जवस/करंज/कडुनिंबाचे तेल प्रति किलो धान्य या प्रमाणात वापरावे. उष्ण हवामानाचा अंदाज लक्ष्यात घेता तोडणीला आलेल्या भाजीपाला पिकांची त्वरित तोडणी करून घ्यावी.

## लाल भेंडी शेतकऱ्यांसाठी ठरतेय फायद्याची

शेतकरी भाजीपाला लागवड करून जेवढे उत्पन्न पारंपारिक शेती करून घेतात तेवढे मिळत नाही. विशेषत: खास भाजीपाल्याची लागवड केल्यास अधिक उत्पन्न मिळते. आपण ज्याच्याबद्दल बोलत आहोत ते म्हणजे लाल भिंडी म्हणजेच लाल भेंडी. लाल भेंडीचे वैशिष्ट्य म्हणजे ती हिरव्या भेंडीपेक्षा जास्त फायदेशीर असते. यासोबतच त्याचे पीकही सामान्य भेंडीच्या तुलनेत लवकर पिकते. लाल भिंडी म्हणजेच लाल भेंडीमध्ये विशेष औषधी गुणधर्म आहेत, त्यामुळे मोठ्या शहरांमध्ये त्याची मागणी कायम आहे. लाल भेंडीच्या लागवडीसाठी १ किलो बियाणे २४०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे, जे अर्धा एकर जमिनीत लागवड करता येते. जर आपण लाल भेंडी म्हणजेच लाल भेंडीपासून कमाईबद्दल बोललो तर लाल भेंडीची किंमत हिरव्या भेंडीपेक्षा ५-७ पट जास्त आहे. हिरवी भेंडी ४० ते ६० रुपये किलो दराने बाजारात उपलब्ध असताना २५० ते ३०० ग्रॅम लाल भेंडी ३०० ते ४०० रुपये किलो दराने विकली जाते. लाल भेंडीची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे लाल भेंडीची मागणी देशापेक्षा परदेशात जास्त आहे. परदेशातही त्याची भरपूर लागवड होते. लाल भेंडीमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात, ज्याला लाल भेंडी असेही म्हणतात. यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि आयर्न मुबलक प्रमाणात आढळतात. ही लाल बोट साखरेच्या रुग्णांसाठी रामबाण उपाय असल्याचे सांगितले जाते. फक्त लागवड करताना त्यात सिंचनाची कमतरता भासणार नाही याची विशेष काळजी घ्यावी लागते. लागवडीनंतर हे पीक अवघ्या ४० ते ५० दिवसांत काढणीसाठी तयार होते. लाल भेंडी ही अशी भाजी आहे जिची उन्हाळ्यात मागणी जास्त असते. यामुळेच भारतीय शेतकरी आजकाल रेड लेडीफिंगरपासून भरपूर नफा कमावत आहेत.



## कांद्यावरील काजळी आणि बुरशीचे नियंत्रण

कांदा साठवणीत रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे कांद्याची सड होऊन गुणवत्ता खालावणे आणि साठवणीचा कालावधी कमी होणे अशी समस्या निर्माण होतात. त्यामुळे काढणीपूर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि काढणीनंतर योग्य साठवण व्यवस्थापन या दोन्ही बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कांद्याची काढणीनंतरची साठवण आणि योग्य व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरते. बाजारातील मागणीनुसार वर्षभर पुरवठा टिकवून ठेवण्यासाठी कांदा ५ ते ६ महिन्यांपर्यंत सुरक्षित व विक्रीयोग्य अवस्थेत राखणे गरजेचे असते. मात्र काढणीपूर्व ते काढणीनंतरच्या टप्प्यांमध्ये योग्य काळजी घेतली नाही तर बुरशीजन्य व जिवाणूजन्य रोगांमुळे कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. योग्य काळजी न घेतल्यास साठवणीत कांद्याचे सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होण्याची शक्यता असते. कांदा साठवणीत काजळी, निळी-हिरवी बुरशी, पांढऱ्या कांद्यावरील काळी बुरशी, बोट्रीटीस रॉट तसेच जिवाणूजन्य सड यांसारखे रोग प्रामुख्याने आढळतात. या रोगांमुळे कांदा सडणे, गुणवत्ता खालावणे आणि साठवणीचा कालावधी कमी होणे अशी समस्या निर्माण होते. त्यामुळेच काढणीपूर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि काढणीनंतर योग्य साठवण व्यवस्थापन या दोन्ही बाबींना तितकेच महत्त्वाचे आहे.

काजळी : हा बुरशीजन्य रोग रब्बी कांदा साठवणीत सर्रास आढळून येतो. रोग काही प्रमाणात उष्ण कटिबंधीय भागात कांदा काढणीच्या वेळेस शेतात दिसून येतो. परंतु साठवणीमध्ये जास्त प्रमाणात नुकसान होते. रोगाची सुरुवात वरील



बाजूच्या पानांकडून होऊन पुढे परिपक्व होण्याअगोदर पाने मरतात. रोगग्रस्त कांद्याच्या वरील भागावर काळ्या काजळी सारखा रंग दिसून येतो. तो भाग कोरडा झालेला दिसतो. कांद्याच्या आतील भागात काळ्या रंगाची काजळी तयार होऊन वरील भागावर काळ्या रेषा तयार होतात. यामुळे जिवाणूजन्य रोगाचे आक्रमण होऊन संपूर्ण कांद्याचे मऊ रॉटमध्ये रूपांतर होते.

पोषक हवामान : रोगाच्या वाढीसाठी २८ ते ३४ अंश सेल्सिअस तापमान, उच्च आर्द्रता आणि उष्ण हवामान या बाबी पोषक ठरतात. या रोगाची बुरशी हवा, माती, प्रादुर्भावित बियाणे आणि कांदा पिकांचे अवशेष यामध्ये जिवंत राहून पुढे प्रसार होतो.

उपाय : कांदा काढणीनंतर शेतात व्यवस्थित सुकवावा, जेणेकरून बाहेरील साल घट्ट होईल. साठवणुकीच्या जागी हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. त्यामुळे बुरशीची वाढ रोखली जाते. साठवणुकीवेळी तापमान ३० अंश सेल्सिअसपेक्षा कमी राखण्याचा प्रयत्न करावा.

निळी-हिरवी बुरशी : सुरुवातीला कांद्यावर फिक्कट पिवळसर जखमा तयार होऊन ठिपके तयार होतात. यामध्ये निळ्या- हिरव्या बुरशीची वाढ होते. प्रादुर्भावित कांद्यामधून राखाडी पातळ द्रव्य बाहेर येतो. तसेच कांदा मऊ होऊन सडतो. प्रादुर्भावग्रस्त कांद्यामधून उग्र वास येतो.ही बुरशी माती, कांद्याची झाडे इत्यादींमध्ये आढळून येते. रोगाचा प्रसार प्रादुर्भावित इजा झालेले कांदे, साठवणुकीत झालेली इजा, उन्हाच्या चटक्यांमुळे झालेली इजा यामुळे होतो.

पोषक हवामान : उच्च आर्द्रता व २१ ते २५ अंश सेल्सिअस तापमान रोगासाठी पोषक असते

उपाय : गोण्यांमध्ये कांदा भरताना, हाताळणी करताना किंवा ट्रॅक्टरमध्ये गोण्या लोड करताना त्याला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.जखम झालेले, साल निघालेले कांदे साठवणुकीत ठेवू नका. ते निवड पद्धतीने बाजूला काढून घ्यावेत.साठवणुकीपूर्वी कांदा चाळीत मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करणे उपयुक्त ठरते.

बोट्रीटीस रॉट : हा रोग शेतामध्ये दिसून येत असला, तरी तो कांदा साठवणीत मोठ्या प्रमाणात दिसतो. रोगाची लक्षणे सुरुवातीला कांद्याच्या गर्भापासून सुरू होतात. तपकिरी रंग येऊन कांदे मऊ होतात. दमट हवामानात राखाडी रंगाची बुरशी प्रादुर्भावित कांद्याच्या वरील बाजूस आणि आतील बाजूस तयार होते. जास्त प्रादुर्भावित कांद्यामध्ये स्क्लेरोशिया सुद्धा दिसून येतात. ही बुरशी साठवणीतील कांदा व जमिनीमध्ये कायमस्वरूपी आढळून येते. ही बुरशी साठवणीतील कांदा व जमिनीमध्ये कायमस्वरूपी आढळून येते. या रोगाच्या स्क्लेरोशियाला ओलसर हवामान संक्रमण करण्यासाठी पोषक असते.

पोषक हवामान : आर्द्रतायुक्त हवामान व १० ते २४ अंश सेल्सिअस तापमान.

उपाय : काढणीनंतर कांदा पात कापताना मान २ ते ३ सेंमी लांब ठेवावी. अगदी जवळून मान कापल्यास बुरशी थेट कांद्यात प्रवेश करते. साधारण ५० ते ७० टक्के माना पडल्यावरच कांदा पिकाची काढणी करावी.




### महत्वाच्या घटना

१८६६ : अमेरिकेत पाच सेन्ट किंवा निकेल हे नाणे व्यवहारात आणले.
१८९९ : क्रांतिकारक बाळकृष्ण चाफेकर यांना फाशी.
१२०४ : बाल्डविन नववा पहिला लॅटिन सम्राट झाला.
१६०५ : पॉल पाचवा पोपपदी.
१९१८ : अमेरिकेत सरकारवर टीका करणे हा तुरुंगवासास पात्र गुन्हा ठरवण्यात आला.
१९२० : पोप बेनेडिक्ट पंधराव्याने जोन ऑफ आर्कला संत ठरवले.
१९२९ : हॉलिवूडच्या ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर, आर्ट्स अँड सायन्सेस या संस्थेतर्फे चित्रपटांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल स्मृतिचिन्ह देण्याचा पहिला समारंभ झाला. याच पारितोषिकांना पुढे ऑस्कर असे नाव पडले.
१९६९ : सोवियेत संघाचे अंतराळयान व्हेनेरा ५ शुक्रावर उतरले.
१९७५ : सिक्कीममधील जनतेने कौल दिल्यावर भारताने सिक्कीमला देशाचा भाग करून घेतले.
१९७५ : जुन्को ताबेई एव्हरेस्टवर चढणारी प्रथम स्त्री ठरली.
१९९३ : बचेन्द्री पालच्या नेतृत्वाखालील पहिल्या महिला भारतीय मोहिमेने सात मुलींसह अठरा गिर्यारोहकांना एव्हरेस्ट पादाक्रांत करण्याचा मान मिळवून दिला व नवा जागतिक विक्रम नोंदविला.
१९९२ : स्पेस शटल एन्डेव्हरची प्रथम अंतराळयात्रा सफल.
१९९६ : भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी सूत्रे हाती घेतली. मात्र आवश्यक पाठिंबा न मिळाल्यामुळे त्यांचे सरकार केवळ १३ दिवस टिकले.
२००० : बॅडमिंटन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी तसेच खेळांचे दूरचित्रवाणी प्रसारण सुलभ करण्यासाठी या खेळातील गेम १५ ऐवजी ७ गुणांचा करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाच्या क्वालालंपूर येथील बैठकीत घेण्यात आला. मात्र २००६ मधे हा नियम परत बदलला गेला.
२००५ : कुवेतमधे स्त्रियांना प्रथमच मतदानाचा हक्क प्राप्त झाला.
२००५ : अमेरिकन वैज्ञानिकांनी क्लोन केलेल्या मानवी भ्रूणाच्या शरीरातून स्टेम पेशी काढण्यात पहिल्यांदा यशस्वी झाले.
२००७ : निकोलाय सारकॉझी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२५ : आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य केरुनाना लक्ष्मण छत्रे यांचा जन्म. (मृत्यू: १९ मार्च १८८४)
१८३१ : मायक्रोफोन चे सहसंशोधक डेव्हिड एडवर्ड ह्यूजेस यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९००)
१८२४ : महान गणितज्ज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांचा जन्म
१८५७ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पटना येथील २७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष रघुनाथ मुधोळकर यांचा जन्मदिन.
१९०५ : अमेरिकन अभिनेते हेन्री फोंडा यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९८२)
१९२६ : माणिक वर्मा, शास्त्रीय व सुगम संगीत गायिका.
१९३१ : के. नटवर सिंग, भारतीय परराष्ट्र मंत्री.
१९४१ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय टक्करवादक बनामाली महाराणा यांचा जन्मदिन.
१९४४ : महाराष्ट्रातील एक प्रसिध्द लोकनेते अभयसिंह राजे भोसले यांचा जन्म
१९५३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय बायोफिजिकल वैज्ञानिक प्राचार्य रामकृष्ण विजयाचार्य होसूर यांचा जन्मदिन.
१९५५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय हातमाग उद्योजक गजम अंजैया यांचा जन्मदिन.
१९७० : गॅब्रियेला सॅबाटिनी, आर्जेन्टिनाची टेनिस खेळाडू.
१९७५ : निरोशन बंदरतिलके, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६५ : पुरंदर किल्ला लढविताना मराठेशाहीतील स्वामीनिष्ठ सरदार मुरारबाजी देशपांडे यांचे प्राणार्पण
१८३० : फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १७६८)
१९२६ : महमद सहावा, शेवटचा ओस्मानी सम्राट.
१९५० : कोल्हापूर संस्थानचे दिवाण व शिक्षणमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १८७८)
१९७७ : माली देशाचे पहिले अध्यक्ष मादीबो केएटा यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९१५)
१९९० : द मपेट्स चे जनक जिम हेनसन यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९३६)
१९९४ : माधव मनोहर, लेखक, समीक्षक.
१९९४ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक फणी मुजुमदार यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९११ फरिदपूर, बांगला देश)
२००० : माधव गोविंद काटकर, मराठी कवी.
२००८ : ओपस वन व्हाइनरी चे सहसंस्थापक रॉबर्ट मोन्डवी यांचे निधन. (जन्म: १८ जुन १९१३)
२०१४ : टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक रुसी मोदी यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९१८)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.१६ मे २०२६




# महसूल विभागाची वाळू माफियावर धडाकेबाज कारवाई

## वाळू माफियांवर फौजदारी गुन्हे दाखल करणार-तहसीलदार चव्हाण

अंबड। प्रतिनिधी

साष्टपिंपळगाव शिवारात अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा जप्त करून चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला यानंतर वाळू माफियांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहे असे आदेश तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिले आहे. सदरील कारवाई जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. अशी माहितीतहसीलदार विजय चव्हाण यांनी यांनी दिली आहे.


 गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उपसा करून शासनाचा महसूल बुडवणाऱ्या माफियांविरुद्ध अंबड महसूल विभागाने आपली कारवाई अधिक तीव्र केली आहे. साष्टपिंपळगाव (ता. अंबड) शिवारात विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारा एक हायवा ट्रक महसूल पथकाने जप्त केला असून, या प्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात चालकावर विविध कलमान्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा तपशील आणि कारवाई जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासाठी तहसीलदार विजय चव्हाण यांच्या आदेशानुसार महसूल विभागाचे 'स्थिर पथक'तैनात करण्यात आले आहे. या पथकामध्ये साष्टपिंपळगावचे तलाठी सुनील तेजराव उंबरहंडे मंडळ अधिकारी कृष्णा येडके तलाठी पवन तुपकरआणि तलाठी विशाल अनारुपेयांचा समावेश आहे. दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४:१६ वाजेच्या सुमारास हे पथक साष्टपिंपळगाव ते आपेगाव शिव रस्त्यावर गस्त घालत असताना,

> अंबड तालुक्यातून अवैध वाळू किंवा कोणत्याही गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अशी वाहने आढळल्यास ती जप्त करून संबंधितांवर कडक फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. नागरिकांनीही अशा अवैध प्रकारांची माहिती प्रशासनाला द्यावी.
> –विजय चव्हाण, तहसीलदार अंबड.

त्यांना एक हायवा ट्रक (क्रमांक ०३ ९८११) संशयास्पद स्थितीत येताना दिसला. पथकाने ट्रक थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये गोदावरी पात्रातील वाळू भरलेली असल्याचे आढळून आले. पथकाने ट्रकचालकाकडे वाळू वाहतुकीच्या रॉयल्टी पावतीची (परवाना) मागणी केली, मात्र त्याच्याकडे कोणतीही पावती नव्हती. चालकाने त्याचे नाव राजू तुळशीराम राठोड (रा. छत्रपती संभाजीनगर) असे सांगितले. अवैध वाळू वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाल्याने पथकाने तत्काळ हा हायवा जप्त करून तहसील कार्यालय अंबडच्या जमा केला.दाखल करण्यात आलेली कलम याप्रकरणी तलाठी सुनील उंबरहंडे यांच्या फिर्यादीवरून दिनांक १४ मे २०२६ रोजी गोंदी पोलीस ठाण्यात चालक राजू राठोड याच्यावर खालील कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे भारतीय न्याय संहिता (), २०२३:कलम ३०३(२) (चोरी) आणि २२३ (लोकसेवकाच्या आदेशाची अवज्ञा). महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ४८(७) व ४८(८). खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७:कलम ४ आणि २१.

सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, १९८४ कलम ३. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व नेतृत्व सदर कारवाई जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडली.

## जालन्यात १०२ बूलेट सायलेन्सरवर फिरवला रोलर



जालना । प्रतिनिधी

जालना शहरात मोटार वाहन कायदयाची प्रभावीपणे व कर्ण कर्कश मांडीफॉय सालयसन्सवर अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक मा. श्री तेघबीर सिंह संधू यांनी कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने शहर वाहतूक शाखा व शहरातील चारही पोलीस स्टेशन च्या वतीने संयुक्त विशेष मोहीम राबवून बुलेटला मोठ्या आवाजाचे मॉडीफाय सायलेन्सर लावून ध्वनीप्रदूषण व कर्ण कर्कश आवाज करणा-या बूलेट वाहनांवर १०२ बूलेट धारकावर मोटार बाहन कायदयानुसार दंडात्मक कार्यवाही करून सायलेन्सर काढून घेण्यात आले होते. ते सायलेन्सर आज दिनांक १५/०५/२०२६ रोजी रोलर फिरवून नष्ट करण्यात आले.

सदरील कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक , श्री तेघबीर सिंह संधू, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कूलकर्णो यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सूरेश, उनवणे आणि वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक घोरपडे, सपोउपनि संजय मगरे, पोहवा कचरू गवते, नंदकिशोर कामे, शिवाजी उबाळे, प्रदीप झरेकर, रघुनाथ अंभोरे यांनी पार पाडली. जालना शहरात मोठ्या आवाजाच्या बूलेटवर सदरची संयूक्त मोहीम घेवून यापूढे सूध्दा वरिष्ठांच्या आदेशानुसार मोहीम राबविण्यात येणार आहे तरी सर्व नागरिकांनी मोटार वाहन कायदयाचे पालन करावे

## दिव्यांग व्यक्तीचे प्रश्न सोडवायचे नसतील तर आयुक्त यांनी खुर्ची खाली करावी-राहुल मुळे




जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिका येथे नवीन आयुक्त अंजली शर्मा यांनी पदभार घेतल्यापासून अद्याप पर्यंत दिव्यांग व्यक्तीचे प्रश्न सोडण्यात अपयश ठरले आता दिव्यांग व्यक्तीचे प्रश्न सोडायचे नसेल तर खुर्ची खाली करा असा इशारा राहुल मुळे यांनी दिला. तसेच दिव्यांग व्यक्तीला निधी किती वाटप करण्यात आली याची माहिती संबंधित कर्मचारी महिलेला विचारले असता त्यांच्याकडून माहिती देण्यास नकार दिला. दिव्यांग निधी बाबत अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांना विचारले असता त्यांच्याकडून सुद्धा माहिती देण्यास नकार देण्यात आला. आता याप्रकरणी आयुक्त शर्मा कारवाई करणार का. महानगरपालिकेत नवीन आयुक्त, अंजली शर्मा शहरातील दिव्यांगांच्या समस्या कायम असल्याचा गंभीर आरोप राहुल मुळे यांनी केला आहे.

शहरातील दिव्यांग नागरिकांना ५० टक्के घरकुल, पाणीपट्टीत सवलत, दरमहा मानधन योजना सुरू करणे तसेच घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशा विविध मागण्यांसाठी दिव्यांग बांधवांनी वेळोवेळी आंदोलने, मोर्चे आणि निवेदने दिली असल्याचे त्यांनी सांगितले.नवीन आयुक्त यांची प्रत्यक्ष भेट घेऊनही दिव्यांगांच्या प्रश्नांवर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची खंत राहुल मुळे यांनी व्यक्त केली. तसेच, मुंबई येथील नगर सचिवालयातील एका अधिकाऱ्याने आयुक्त व उपायुक्त यांना दूरध्वनी करून राहुल मुळे हे वारंवार मुंबईत येऊन दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा करत असल्याची माहिती दिली होती. दिव्यांगांना मानधन योजना सुरू करण्यासाठी लक्ष घालावे, अशी सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांनी केल्याचे मुळे यांनी सांगितले. मात्र, त्यानंतरही महानगरपालिका प्रशासनाने या विषयाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दिव्यांगांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिव्यांग संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे. जालना शहरातील दिव्यांगांच्या विविध प्रलंबित मागणी राहुल मुळे यांनी केली आहे. दिव्यांगांना मानधन योजना, घरकुल, पाणीपट्टी सवलत तसेच इतर मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी वारंवार पाठपुरावा करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन आयुक्त अंजली शर्मा यांच्याकडे अनेकदा निवेदने देऊनही दिव्यांगांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप राहुल मुळे यांनी केला आहे. दिव्यांगांच्या प्रश्नांवर महानगरपालिका चे आयुक्त अंजली शर्मा यांनी तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## अवैध वृक्षतोड वाहतूक टेम्पोवर कारवाईचा बडगा!

### वृक्षतोड करणाऱ्या टपोरी गँगचे धाबे दणाणले !

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव येथे अवैध वृक्षतोड करून वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर पाथर्डी वनपरिक्षेत्र कार्यालयातील ग्रीन सोल्जर पथकाने छपा टाकून धडक कारवाई केली आहे सदरील टेम्पोमध्ये बेकायदेशीर लिंब प्रजातीच्या वृक्षांची कत्तल करून बेकायदेशीर वाहतूक करण्यात येत होती ही कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या नेतृत्वाखाली संदीप एकशिंगे वनपाल बबन मंचरे बाळकृष्ण बडे शिवनाथ जीवडे यांच्या पथकाने केली असून सदरील टेम्पो जप्त करण्यात आला आहे अहिल्यानगर उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल सहाय्यक वनसंरक्षक अश्विनी दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कारवाई करण्यात आली असून अवैध वृक्षतोड करणाऱ्या टपोरी गँगचे दणाणले आहेत.



## ज्येष्ठ पत्रकार पंडितराव बोराडे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार

मंठा। प्रतिनिधी

संतकृपा सेवा प्रतिष्ठान आणि समर्थ सेवा समूह मित्र मंडळ छत्रपती संभाजीनगरच्या वतीने दिला जाणारा मानाचा मराठवाडा भूषण पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार पंडितराव बोराडे यांना प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्त दरवर्षी विविध क्षेत्रातील गुणवंतांना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. श्री संत शिरोमणी जगतगुरु संत तुकाराम महाराज सभागृह छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

हा पुरस्कार कृषीभूषण विजयअण्णा बोराडे, विभागीय कामगार कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे, मराठा सेवा संघाची प्रमुख मार्गदर्शक विंग कमांडर टी आर जाधव, महाराष्ट्र राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश केसरकर, तत्कालीन विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड, स्वर विहारचे संचालक तथा सुप्रसिद्ध गायक राजेश सरकटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. ज्येष्ठ पत्रकार पंडितराव बोराडे यांनी आपल्या ४० वर्षाच्या पत्रकारितेच्या कारकीर्दीमध्ये विविध वर्तमानपत्रात लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. श्री बोराडे यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना मराठवाडा भूषण या पुरस्काराने गौरविण्यात आले. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## पैठणमध्ये होमगार्डची आत्महत्या

पैठण । प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील राहूलनगर (कातपूर) येथील एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या ३९ वर्षीय होमगार्डने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी (१३ मे) सकाळी उघडकीस आली. देविदास लहुराव बोर्डे (३९) असे मृताचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, देविदास बोर्डे हे एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात होमगार्ड म्हणून कार्यरत होते. त्यांनी राहूलनगर येथील आपल्या राहत्या घरातील खोलीमध्ये सिलींग फॅनला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. बुधवारी सकाळी ७ वाजता ही बाब त्यांच्या भावाच्या निदर्शनास आली. माहिती मिळताच कर्तारसिंग सिंगल व रामेश्वर पंडीत यांनी घटनास्थळी धाव घेतली. देविदास बोर्डे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. आत्महत्या कारण अस्पष्ट आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समजू शकले नसून एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## विलंबित जन्म-मृत्यू नोंदींमधील त्रुटी पूर्ण करा अन्यथा प्रकरणे रद्द होणार-तहसीलदार चव्हाण

अंबड। प्रतिनिधी

जुलै २०२५ पर्यंतच्या प्रलंबित संचिकांचा एका आठवड्यात लागणार निकाल; ऑगस्टची प्रकरणे मे अखेरीस महाराष्ट्र शासनाने विलंबित जन्म आणि मृत्यू नोंदींबाबत (एक वर्षापेक्षा जास्त कालावधी) अत्यंत कठोर आणि स्पष्ट कार्यपद्धती लागू केली आहे. बनावट आणि अवैध नोंदी टाळण्यासाठी शासनाने कागदपत्रांची आणि चौकशीची कडक नियमावली आखून दिली आहे. या नियमांच्या अधीन राहून अंबड तहसील कार्यालयात कार्यवाही सुरू आहे. मात्र, अनेक अर्जदारांनी जुलै २०२५ पूर्वी अर्ज करूनही आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे मागील एक वर्षापासून अनेक संचिका प्रलंबित आहेत. या सर्व संचिका येत्या एका आठवड्यात निकाली काढण्याची मोहीम तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी विजय चव्हाण यांनी हाती घेतली आहे.

प्रलंबित प्रकरणांमधील प्रमुख त्रुटी शासनाच्या १२ मार्च २०२५ च्या निर्णयानुसार, जन्म-मृत्यू नोंद घेण्यासाठी वैद्यकीय, शैक्षणिक, रहिवासी आणि कौटुंबिक पुरावे असणे बंधनकारक आहे. अंबड तहसीलमध्ये जुलै २०२५ पर्यंत प्रलंबित असलेल्या ५० पेक्षा जास्त संचिकांमध्ये प्रामुख्याने खालील त्रुटी आढळून आल्या आहेत: स्थानिक वृत्तपत्रात १५ दिवसांचे जाहीर प्रगटन दिलेले नसणे.ग्रामसेवक किंवा मुख्याधिकारी यांचा स्थानिक चौकशी अहवाल नसणे. पोलीस पाटील आणि पोलीस बीट अंमलदार यांचा चौकशी अहवाल जोडलेला नसणे. जन्माचा किंवा मृत्यूचा कोणताही वैद्यकीय पुरावा (उदा. रुग्णालयाची नोंद) उपलब्ध नसणे.शैक्षणिक पुरावे (उदा. शाळा सोडल्याचा दाखला) आणि रहिवासी पुरावे अपूर्ण असणे.

महत्त्वाचे आवाहन व अल्टीमेटम अंबड तालुक्यातील ज्या अर्जदारांची जुलै २०२५ पर्यंतची प्रकरणे वरील त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांना या प्रेस नोटद्वारे अंतिम अल्टीमेटम देण्यात येत आहे. संबंधितांनी येत्या एका आठवड्याच्या आत आपल्या प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करावी आणि आवश्यक ते सर्व कायदेशीर पुरावे तहसील कार्यालयात सादर करावेत. जर एका आठवड्यात पुराव्यांची पूर्तता केली नाही, तर शासनाच्या निर्देशानुसार ही सर्व प्रलंबित प्रकरणे 'विना निर्णय निकाली' (रद्द) काढण्यात येतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.ऑगस्ट २०२५ च्या प्रकरणांसाठी सूचना जुलै महिन्यातील संचिका निकाली काढल्यानंतर, ऑगस्ट २०२५ मधील प्रलंबित प्रकरणांची सुनावणी आणि निकाली काढण्याची प्रक्रिया मे २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात पार पडणार आहे. या प्रकरणांतील अर्जदारांनीही वेळेत आपल्या त्रुटी दूर करून अचूक पुरावे सादर करणे बंधनकारक आहे. विहित वेळेत पुरावे सादर न केल्यास ऑगस्ट महिन्यातील संचिका देखील कायमस्वरूपी रद्द केल्या जातील. शासनाने विलंबाने होणाऱ्या जन्म-मृत्यू नोंदींबाबत अत्यंत कडक धोरण अवलंबले असून, केवळ आधार कार्ड ग्राह्य धरले जाणार नाही. त्यामुळे नागरिकांनी अधिकृत पुराव्यांसह कार्यालयाशी संपर्क साधून आपली प्रकरणे निकाली काढून घ्यावीत, असे आवाहन तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे. विशेष टिप:- कुणीही अवैध व्यक्तिशी संपर्क करु नये किंवा लाच/ पैसे देऊ नये तशी कुणी मागणी करत असल्यास पुराव्यानिशी माझ्याकडे तक्रार करावी अफवांवर विश्वास ठेवू नये



जालना : पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांची भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी भेट घेऊन पुष्पगुच्छ देत स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या भेटीदरम्यान जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होऊन नागरिकांना सुरक्षित व भयमुक्त वातावरण मिळेल, तसेच पोलीस प्रशासन व नागरिकांमधील समन्वय अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी श्री. गोवर्धन कोल्हे, श्री. राजेश जोशी व तालुकाध्यक्ष श्री. संजय डोंगरे उपस्थित होते.

cmyk



# बीडमध्ये रखडलेले राष्ट्रीय महामार्गाचे काम, अवैध कत्तलखाने प्रकरणी भाजप आक्रमक

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातून जाणाऱ्या अहिल्यानगर–बीड राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ वरील बालेपीर परिसरातील मस्जिदजवळ आणि बार्शी नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या रखडलेल्या रस्ता व नाली कामांबाबत तसेच अवैध कत्तलखान्यावर कारवाई करण्यासंदर्भात भाजपच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना शुक्रवारी (दि.१५) निवेदन दिले आहे. रखडलेली कामे एका महिन्याच्या आत पूर्ण करावीत, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही**



**निवेदनाद्वारे देण्यात आला.**

भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर, ॲड.सर्जेराव तांदळे, यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले की, बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ वरील बालेपीर भागातील नाली व रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे पवनसुत मंगल कार्यालयापासून ते कर्परा नदीपर्यंत रस्त्याच्या दक्षिणेकडील वस्त्यांमधील नाल्यांचे सांडपाणी अहिल्यानगर रोडलगतच्या नालीमध्ये येते. मात्र, तेथून पुढे कर्परा नदीकडे जाणाऱ्या नालीचे काम पूर्ण झाले नसल्याने अनेक नाल्यांचे पाणी साचून राहत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी, डासांची उत्पत्ती आणि नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सदर नालीचे काम आजपर्यंत पूर्ण का झाले नाही, असा सवालही करण्यात आला आहे. तसेच बालेपीर दर्गाजवळील रस्त्याच्या दक्षिण बाजूचे १५ मीटर रुंदीचे रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने परिसरात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. दक्षिण बाजूचे काम रखडल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. बालेपीर दर्गा व जिल्हाधिकारी

◀◀ पान २ वर

### अवैध कत्तलखान्यावर कठोर कारवाई करा– शंकर देशमुख

बीडसह जिल्ह्यातील अवैध कत्तलखान्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही मागणी केली आहे. तसेच, गोरक्षकांनी माहिती दिल्यानंतर पोलीस प्रशासनाने स्वतःहून कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह पोलीस प्रशासनाकडे केली आहे. अन्यथा गोरक्षकांना घेऊन रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# सुतगीरणीवरील गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करा-अनिल तुरुकमारे

## वस्त्रोद्योग मंत्रालयाने लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सूतगिरणीवर प्रशासक नेमावा

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगीरणी, केज येथील कथित गैरव्यवहार, बोगस कागदपत्रे, आर्थिक अनियमितता आणि शासनाची फसवणूक प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून सुतगीरणीवर तात्काळ प्रशासक नियुक्त करावा, अन्यथा दि. २५ मे २०२६ पासून मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा पीपल्स रिपाईचे जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांनी शासनाला दिला आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री, वस्त्रोद्योग मंत्री, समाजकल्याण मंत्री तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, सुतगीरणीच्या मुख्य प्रवर्तक व व्यवस्थापनाने बोगस व बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची दिशाभूल करून वस्त्रोद्योग विभागाकडून तब्बल ३३ कोटी १२ लाख रुपयांचा निधी उचलला आहे. या प्रकरणी अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर वस्त्रोद्योग विभागाने टेस्ट ऑडिट व विशेष लेखापरीक्षण सुरू केले असून सुतगीरणीवर



प्रशासक नेमण्याबाबत कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच समाजकल्याण विभागाकडूनही कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, ४२० चे गुन्हे व विविध तक्रारी प्रलंबित असतानाही १४ कोटी रुपये वितरित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

◀◀ पान २ वर

# जायकवाडीचा पाणीप्रश्न पुन्हा पेटला

## शेतकऱ्यांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट, आंदोलनाची दिली हाक

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पाचविला पुंजलेला दुष्काळ दूर करण्यासाठी व शेतशिवार हिरवेगार करण्यासाठी शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळणे गरजेचे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही मागणी धगधगत आहे. यासाठी



लोकलढा आंदोलनातील शेतकर्यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेत आंदोलनाची हाक दिली. त्यामुळे जायकवाडी धरणाचा पाणीप्रश्न पुन्हा एकदा पेटला आहे.

श्री क्षेत्र भगवान गड ते मादळमोही, माजलगाव तालुक्यातील तालखेड, नाथापूर पर्यंतच्या जवळपास शंभर किलो मीटर अंतरातील शेतीला जायकवाडी धरण व कृष्णा खोर्याचे पाणी मिळत नाही. त्यामुळे शिरूर, बीड, गेवराई, वडवणी

◀◀ पान २ वर

# ठाकर आडगाव सप्ताहाच्या हिशोबाचा वाद शिगेला

## कीर्तनकार कैलास महाराज यांच्यावर जीवघेणा हल्ला

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील ठाकर अडगाव येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या हिशोबाच्या वादातून एका कीर्तनकार महाराजांवर हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात कीर्तनकार कैलास आनंदराव महाराज गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना बुधवारी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या दरम्यान जातेगाव रोड परिसरात घडली. गेवराई तालुक्यातील ठाकर अडगाव येथे नुकताच अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता. सप्ताहाच्या हिशोबावरून संबंधितांमध्ये वाद निर्माण झाला होता. याच वादातून सात जणांच्या टोळक्याने कैलास आनंदे महाराज यांना रस्त्यात अडवून बेदम मारहाण केली आहे.

हल्लेखोरांनी लोखंडी रॉड, लाकडी दांडे तसेच केबल वायरच्या साहाय्याने महाराजांना मारहाण केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. मारहाणीत महाराजांच्या डोक्यासह शरीराच्या विविध भागांवर गंभीर दुखापती झाल्या आहेत. स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी अवस्थेतील महाराजांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. हल्लेखोरांनी मारहाण करताना यावेळी वाचलास, तू पुन्हा दिसलास तर संपवून टाकू, अशी धमकी

◀◀ पान २ वर

## राष्ट्रीय महामार्ग झाले; पण भुरेवाडीकरांचा जीव अजूनही खड्ड्यातच!

**पाटोदा । प्रतिनिधी**

सौताडा–भुरेवाडी–मुगगाव रस्त्याची दयनीय अवस्था; ग्रामस्थांचा जिल्हा परिषद निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा पाटोदा तालुक्यात एकीकडे राष्ट्रीय महामार्गांचे जाळे विस्तारत असताना दुसरीकडे ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था मात्र अत्यंत बिकट झाली आहे. सौताडा–भुरेवाडी–मुगगाव–हातोला मार्ग अनेक वर्षांपासून मंजूर असूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेषतः भुरेवाडी येथील नागरिकांना खराब रस्त्यामुळे दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की रस्त्यावरून बैलगाडी चालवणेही कठीण झाले आहे. मोठमोठे खड्डे, चिखल आणि उखडलेला रस्ता यामुळे वाहनचालकांसह शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांना सततच्या धक्क्यांमुळे कमरेचे व मणक्याचे आजार जडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. दर पावसाळ्यात विंचरणा नदीला पूर आल्यानंतर भुरेवाडी व शिंदे वस्तीचा संपर्क पूर्णपणे तुटतो. नदीतील पाणी दहा–दहा दिवस ओसरत नसल्याने नागरिकांना मुगगावमार्गे

◀◀ पान २ वर

# बीड पं.स.च्या नरेगा विभागातील ११ कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त कधी करणार?

### आ.संदीप क्षीरसागरांच्या तक्रारीनंतरही कार्यवाही होईना

### ३ वर्षांहून अधिक काळ एकाच ठिकाणी कार्यरत

**बीड । प्रतिनिधी**

येथील पंचायत समितीच्या नरेगा विभागात तीन वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अद्याप कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. विशेष म्हणजे याप्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर यांनी तक्रार केल्यानंतरही संबंधित कर्मचाऱ्यांबाबत ठोस कार्यवाही होत नसल्याने जिल्हा परिषद प्रशासनाचे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांना पाठविलेल्या पत्रात नरेगा विभागातील काही कर्मचारी तीन वर्षांपेक्षा अधिक काळापासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (एपीओ), तांत्रिक सहाय्यक (पीटीओ) तसेच क्लार्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर या संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक आणि कर्तव्यात अनियमितता होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचेही पत्रात म्हटले आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदलीसंदर्भात कार्यवाही करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. संबंधित कर्मचारी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत असल्याचे प्रशासनाने स्वतःच्या पत्रात मान्य केले असतानाही त्यांना अद्याप कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. त्यामुळे बदली प्रक्रियेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात

◀◀ पान २ वर

# बीड पोलीस दलाचा 'फिटनेस' मंत्र; 'सशक्त शरीर, सशक्त सेवा' पोषण सत्र उत्साहात संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

**पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावे, या उद्देशाने बीड पोलीस दलाच्या वतीने "सशक्त शरीर, सशक्त सेवा" या विशेष पोषण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून 'योग्य आहार, चांगले आरोग्य आणि उत्तम सेवा' असा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.**

या विशेष कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बीडचे पोलीस अधीक्षक मा. श्री. नवनीत कॉंवत (भा.पो.से.) यांनी भूषविले. पोलीस दलातील कामाचे स्वरूप अत्यंत आव्हानात्मक आणि धावपळीचे असते. अशा परिस्थितीत स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. आहारतज्ज्ञांचे बहुमोल मार्गदर्शन प्रसिद्ध आहारतज्ज्ञ डायटिशियन दिव्या मंगनानी यांनी या सत्रात मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना संतुलित आहाराचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी खालील मुद्द्यांवर विशेष प्रकाश टाकला: पोषक घटक: शरीरासाठी आवश्यक असलेल्या विविध

◀◀ पान २ वर

# विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधा व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार–आ.सुरेश धस

**पाटोदा । प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधा व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार असून पालकांनी पाल्यांच्या भविष्यासाठी त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असून मोबाईलचा होणारा अती वापर थांबविण्याचे आवाहन आ.सुरेश धस यांनी यावेळी केले.**

आ. सुरेश (आण्णा) धस प्रतिष्ठान, अंमळनेर सर्कल यांच्या वतीने आयोजित "गुणगौरव व वेध भविष्याचा



करिअर मंत्र" हा प्रेरणादायी कार्यक्रम शुक्रवारी कुसळंब येथील श्री खंडेश्वर मंदिर परिसरात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात दहावी–बारावीतील गुणवंत विद्यार्थी तसेच पोलिस व महसूल प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थी, एनएमएस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. माऊली जरांगे यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी, स्पर्धा परीक्षा, प्रशासकीय सेवा तसेच उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक दिशा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बोलताना आ. सुरेश धस यांनी रद्द झालेली परीक्षा पुढील महिन्यात २१ तारखेला घेण्याचा निर्णय घेतल्याबद्दल केंद्र व राज्य सरकारचे आभार मानले. या निर्णयामुळे विद्यार्थी व पालकांमधील संभ्रम दूर होऊन समाधानाचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी "मिशन जरेवाडी पॅटर्न"

◀◀ पान २ वर

# गेवराई पोलिसांनी २४ तासांत दुचाकी चोरटा जेरबंद

**गेवराई । प्रतिनिधी**

**स्थानिक पोलिसांनी अत्यंत वेगाने तपास करत एका दुचाकी चोरट्याला चोरीच्या २४ तासांच्या आत अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त केली असून, आरोपीला आज न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.**




मिळालेल्या माहितीनुसार, १३ मे २०२६ रोजी दुपारी ३:३० च्या सुमारास गेवराई शहरातील जुना बसस्थानक परिसरातील हॉटेल साई प्रसादसमोरून एक दुचाकी चोरीला गेली होती. या प्रकरणी दुचाकी मालकाने १४ मे रोजी गेवराई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कांवत यांनी चोऱ्यांच्या गुन्ह्यांना आळा घालण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने, पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने तपास चक्र वेगाने फिरवली. अवघ्या २४ तासांच्या आत पोलिसांनी आरोपी परसराम आबासाहेब बाराखडे (रा. गोविंदवाडी) याला ताब्यात घेतले. आरोपीच्या ताब्यातून एम.एच. २१ ए.एम. २०८९ या क्रमांकाची

◀◀ पान २ वर

# वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणावर पोलीसांचा हातोडा

## नगर पालिका व वाहतुक शाखेची संयुक्त कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

**आज दि.१५ मे २०२६ शुक्रवार रोजी दुपारी १२ ते ३.०० च्या दरम्यान कडाक्याच्या उन्हासह नगर पालिका व वाहतुक शाखेने बेकायदेशीर मार्गाने अतिक्रमण करणाऱ्यांवर चांगलाच कारवाईचा हातोडा चालविला. दरम्यान यापुर्वी दि.१३ मे २०२६ रोजी जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी पुढाकार घेवून नगर पालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना शहरातील अवैध अतिक्रमणाबाबत सविस्तर पत्र दिले होते.**

### अतिक्रमण करु नका सहकार्य करा अन्यथा मोठी कारवाई करु–खेडकर

अतिक्रमण धारकारकांनी शासनाचे नियम पाळावेत तसेच वाहतुकीस अडथळा येवू नये यासाठी सहकार्य करावे अन्यथा यानंतर जिल्ह्यात व बीड शहरात मोठी कारवाई करु असा इशारा वाहतुक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांनी दिला आहे.

सदर कारवाई ही छत्रपती शिवाजी महाराज चौक ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, बस स्टॅण्ड परिसर दरम्यान रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या ४० अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यात आली. तद्नंतर या रस्त्याने मोकळा श्वास



घेतल्याचे चित्र पहायला मिळाले. यावेळी वाहतुक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर यांनी प्रत्यक्ष कडाक्याच्या उन्हामध्ये उभारुन कारवाई केली व यापुढे अतिक्रमण करु नका असे आवाहन केले आहे. पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत व नगर पालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या सांगण्यावरुन नगर पालिकेचे अतिक्रमण विभागप्रमुख मुन्ना गायकवाड आणि वाहतुक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर,

◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

cmyk




# देशात आर्थिक मंदीचा धोका? शरद पवारांनी उपस्थित केला गंभीर प्रश्न

## मोदींना दिली 'ही' महत्त्वाची सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

**इराण –अमेरिका युद्धामुळे भारत देशातही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचा अर्थव्यवस्थेवरही विपरित परिणाम होण्याचा धोका आहे. त्याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन व परकीय चलन बचतीबाबत केलेल्या आवाहनाची देशभर चर्चा आहे. हे आवाहन सर्वांनीच गांभार्याने घेणे गरजेचे आहे. पंतप्रधानांनी सर्वपक्षीय बैठक बोलवून सर्वांना विश्वासात घ्यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे.**

नुकत्याच झालेल्या निवडणुकांच्या काळात इंधन बचतीबाबतचा विचार सत्ताधाऱ्यांना का आला नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. पुण्यातील पत्रकार परिषदेत पवार यांनी विविध विषयांवर भाष्य केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील नागरिकांना इंधन जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. त्यावर भाजपच्या काही मंत्र्यांनी गाड्याचा ताफा कमी केला. काहींनी ताफाच सोडला. कोणी पायी चालतोय, कुणी दुचाकीवर जातोय, असे चित्र पाहायला मिळत आहे. एका दिवसाच्या बचतीने फारसा फरक पडणार नाही. त्यात किती सातत्य राहील, हे महत्वाचे आहे. त्यामुळे पंतप्रधानांच्या आवाहनावर नेते, मंत्र्यांनी केवळ दिखाऊपणा करून चालणार नाही, असा टोलाही पवार यांनी लगावला. इंधन बचतीबाबत निवडणुकांच्या कालावधीत सत्ताधाऱ्यांनी जनतेत जनजागृती करायचा हवी होती. मात्र, प्रत्यक्षात तसे का झाले नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. पंतप्रधान संसदेत विश्वासदर्शक किंवा अविश्वास ठराव वगळता फारसे उपस्थित राहात नाहीत. सर्वपक्षीय बैठकांनाही ते उपस्थित राहात नाहीत, अशी टीका करून देशाच्या प्रमुखांनी सातत्याने संसदेत उपस्थित राहणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी देशाच्या




लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याबाबत वापरलेली भाषा अयोग्य आहे. विरोधी पक्षनेते हे घटनात्मक आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल टिंगलटवाळी करणे योग्य नाही, असेही पवार यांनी नमूद केले.

रुपयाची घसरण का होतेय, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. सोन्याच्या खरेदीवर थेट आक्षेप नाही. मात्र, अनावश्यक खर्च कमी करण्यावर सर्वांनीच भर दिला पाहिजे. देशातील परिस्थिती गंभीर असल्याने सर्वांनी जबाबदारीने वागावे लागेल. आर्थिक मंदी येऊ नये, यासाठी नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा आहे, असे पवार म्हणाले. गेल्या चार वर्षांपासून माझ्या ताफ्यात फक्त तीनच गाड्या आहेत. स्वतःला बुलेटप्रूफ गाडी दिली होती. मात्र, ती नाकारून स्वतःची गाडी वापरत असल्याचे पवार यांनी नमूद केले आहे. ताफ्यात बदल करण्याची विनंती विशेष सुरक्षा विभागाकडे करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. काही राज्यांतील निवडणुकांचे निकाल अपेक्षेपेक्षा वेगळे लागल्याचे सांगून नवीन पक्षांना काँग्रेसने दिलेल्या पाठिंब्यामुळे इंडिया आघाडी काही ठिकाणी नाराजी आहे. मात्र, ती दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही पवार यांनी स्पष्ट केले.

# पुण्यातील त्या रुग्णालयात बॉम्ब का ठेवला होता? पोलिसांच्या तपासात धक्कादायक माहिती उघड

**पुणे । प्रतिनिधी**

**उपचारासाठी लागणारा खर्च परवडत नसल्याने खासगी रुग्णालयाकडून खंडणी उकळण्याच्या उद्देशाने एका व्यक्तीने पुण्यातील रुग्णालयात आयईडी (स्फोटकसदृश यंत्र) ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शिवाजी राठोड या आरोपीला महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) नागपुरातून अटक केली.**



पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, राठोड हा पुण्यातील मांजरी परिसरात कपड्यांचे दुकान चालवतो. १० मे रोजी तो उपचारासाठी हडपसर येथील उषाकिरण रुग्णालयात गेला होता. मात्र, उपचाराचा खर्च जास्त असल्याने त्याच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. त्यानंतर रुग्णालयात बॉम्ब ठेऊन खंडणी उकळण्याचा कट त्याने रचला. बुधवारी सायंकाळी रुग्णालयाच्या स्वच्छतागृहात आयईडी आढळून आल्यानंतर बॉम्ब शोधक व नाशक पथकाने ते निकामी केले. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीची ओळख पटली. त्याच्या दुकानाच्या झडतीत आयईडीमध्ये वापरलेल्या टाइमरचे रिकामे कव्हरही जप्त करण्यात आले. दरम्यान, आरोपी मुंबई एलटीटी–शालीमार एक्स्प्रेसने पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना एटीएस आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या (आरपीएफ) संयुक्त कारवाईत नागपुरात पकडण्यात आला. या कटात आणखी कोणी सहभागी होते का, याचा तपास सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.


# मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर मोठा अपघात

## तीन मालवाहतूक ट्रक पलटले; वाहतूक ठप्प!

**पुणे । प्रतिनिधी**

**मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर भीषण अपघात झाला आहे. मिसिंग लिंक रोड संपताच या दुर्घटनेत तीन मालवाहतूक ट्रक पलटल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातामुळे एक्सप्रेसवेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.**

अपघात मिसिंग लिंक रोड संपण्याच्या ठिकाणी झाल्याने वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. जवळपास ३ ते ४ किलोमीटरपर्यंत वाहनं थांबली असल्याचे दिसून आले




आहे. ही कोंडी केवळ मिसिंग लिंक भागातच नव्हे तर जुन्या घाटाच्या दोन्ही बाजूंनी पसरली आहे. अपघातग्रस्त ट्रक आणि बसेसमुळे एक्सप्रेसवेचा पूर्णपणे एक बाजूचा मार्ग अडवला गेला. परिणामी, मुंबईकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना प्रचंड उशीर होत आहे. स्थानिक वाहतूक पोलिस आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली असून, अपघातग्रस्त वाहनं हटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, कोंडी कमी होण्यास अजून काही वेळ लागण्याची शक्यता आहे. या अपघातामुळे प्रवासी आणि वाहनचालकांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक जण तासन्तास वाहनांमध्ये अडकले आहेत. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, मिसिंग लिंक रोडच्या समाप्तीच्या ठिकाणी वाहतुकीचे नियम पाळले नसल्याने हा अपघात घडला असावा, अशी प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासनाने प्रवाशांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा किंवा अपडेट्स तपासूनच निघावे, असे सल्ला देण्यात आला आहे.

# मोदींच्या आवाहनानंतर काही जण सायकलवर

## काहीजण बैलगाडीने पोहोचले पालिकेत; तर पिंपरी चिंचवडच्या महापौरांनी परदेशी दौरा केला रद्द

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी मुख्यमंत्र्यानंतर आता पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे कामकाम सायकलवर करत असतान दिसले. पण केवळ एक दिवस सायकल प्रवास करुन भागणार नाही, त्यामुळं आठवड्यातून एक दिवस सायकलवरून कामकाज करण्याचा निर्धार केला आहे. मी पदावर आहेत तोपर्यंत याचं अनुकरण करेल, असं महापौर म्हणाले. सोबतच स्मार्ट सिटी अंतर्गत शेअरिंग सायकलची बारगळेलेली योजना नव्यानं सुरु करणार असल्याचं आणि प्रत्येक रस्त्यावर सायकल ट्रॅक उभारणार असल्याचे ते म्हणाले. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे तीन नगरसेवक थेट बैलगाडीने पिंपरी चिंचवड महापालिकेत दाखल झाले. सर्व साधारण सभेला हजेरी लावताना पंतप्रधानांच्या आवाहनाला त्यांनी असा प्रतिसाद



दिला आहे. मात्र महायुतीतील भाजप पालिकेत उधळपट्टी करुन पंतप्रधानांच्या आवाहनाला हरताळ फासत आहेत, अशी टीका या नगरसेवकांनी केली आहे. पिंपरी चिंचवडचे अखेर महापौर रवी लांडगेंनी परदेश दौरा रद्द केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला साथ देत, देशहितासाठी हा अभ्यास दौरा रद्द करत असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. सोबतचं आठवड्यातून एक दिवस सायकल वर प्रवास करणार, पालिका अधिकाऱ्यांना प्रति महिना पन्नास हजार रुपयांचा इंधन भत्ता देण्याचा प्रस्ताव फेटाळणार आणि नव्यानं खरेदी केली जाणारी वाहनं इलेक्ट्रिक खरेदी करणार असल्याचे लांडगेंनी स्पष्ट केले. पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, सार्वजनिक वाहतूक आणि अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने परदेश दौऱ्यांवर निर्बंध, सार्वजनिक वाहतूक वापरण्याचा सल्ला आणि डिजिटल बैठका घेण्याचे आदेश जारी केले आहेत. मुख्य सचिवांच्या परिपत्रकानुसार, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एकदा मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# नरेश म्हस्के यांची खासदारकी कायम!

### सर्वोच्च न्यायालयाने राजन विचारेंची याचिका फेटाळली



**पुणे । प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि माजी खासदार राजन विचारे यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावत शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे.

नरेश म्हस्के यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रात गुन्ह्याची माहिती लपवली असल्याचा आरोप राजन विचारे यांनी या याचिकेद्वारे केला होता. तसेच नरेश म्हस्के यांच्यावर कारवाई करून त्यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली होती. मात्र, याचिकेमध्ये कोणतेही ठोस तथ्य नसल्याचे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली. राजन विचारे यांनी याचिका दाखल करताना दावा केला होता की, म्हस्के यांनी एका दंगलप्रकरणातील शिक्षा निवडणूक प्रतिज्ञापत्रात नमूद केली नव्हती. त्यांचा दावा होता की ही माहिती लपवून मतदारांची दिशाभूल करण्यात आली. मात्र न्यायालयाने याचिकेत ''ठोस कारण'' नसल्याचे सांगत ती फेटाळली. यावर बोलताना नरेश म्हस्के म्हणाले की, सत्याचा विजय झाला आहे. माझ्याविरोधात राजकीय हेतूने आरोप करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने तथ्यांच्या आधारे निर्णय दिला असून न्यायव्यवस्थेवर माझा पूर्ण विश्वास आहे. विरोधकांकडून केवळ आहेत ते कार्यकर्ते थांबवण्यासाठी हा केविलवाणा प्रयत्न असल्याचेही ते म्हणाले.

# जन्मठेप भोगणारा कैदी फरार!

## येरवडा कारागृहात आठवड्यातील दुसरी घटना

**पुणे । प्रतिनिधी**


**येरवडा येथील खुल्या कारागृहातून आणखी एका कैद्याने पळ काढला आहे. हा कैदी खुनाच्या गुन्ह्यात जन्म ठेपेची शिक्षा भोगत होता. जनार्दन शंकर अडसुळे (रा. काशेवाडी भवानी पेठ) असे त्याचे नाव आहे. दरम्यान, ८ मे रोजी याच खुल्या कारागृहातून एका कैद्याने पळ काढला आहे. याप्रकरणी येरवडा कारागृह प्रशासनाच्या वतीने चंद्रकांत सयाजी खांदवे (५८) यांनी येरवडा पोलिसांत फिर्याद दिली आहे.**




पोलिसांनी कैदी जनार्दन अडसुळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १२ मे रोजी दुपारी दोन ते सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कैदी जनार्दन अडसुळे याच्यावर खडक पोलिसांत खुनाचा गुन्हा दाखल आहे. त्याला न्यायालयाने या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. मात्र, त्याच्या कारागृहातील चांगल्या वर्तनामुळे त्याला खुल्या कारागृहात ठेवण्यात आले होते. तो तेथे शेतीतील कामे करत होता. मात्र, १२ मे रोजी त्याने त्याला झालेली उर्वरीत झालेली शिक्षा चुकविण्याच्या हेतूने कायदेशीर रखवालीतून पळ काढला. रात्री उशिरापर्यंत अडसूळे सापडला नाही. त्यानंतर कारागृह प्रशासनाने येरवडा पोलिसांत तक्रार दिली. येथून ८ मे रोजी संतोष लक्ष्मण भिंगारे (रा. पाचवड, ता. वाई, जि. सातारा) या जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्याने पळ काढला होता. त्याला नुकतेच गुन्हे शाखेने अटक केली आहे. आता पुन्हा दुसऱ्या कैद्याने पळ काढल्याचे समोर आले आहे. त्यामुळे कारागृहातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# पुण्यात मध्यरात्री थरकाप उडवणारा भीषण अपघात

## भरधाव कार पिकअपला धडकली, कारचा चक्काचूर; ८ जण गंभीर जखमी




**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्याच्या मुळशी तालुक्यातील पौडजवळ मध्यरात्री भरधाव कारची उभ्या पीक अप गाडीला धडक बसून भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात कारमधील ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार रात्री उशिरा पुणे–कोलाड महामार्गावर ही घटना घडली आहे. पौडच्या विठ्ठलवाडी फाटा परिसरात तरकारी माल घेऊन रस्त्याच्या कडेला पीक अप गाडी उभी होती. त्या गाडीला एका लाल रंगाच्या गाडीने अतिशय वेगात धडक दिली. यामध्ये कारचे मोठे नुकसान झाले असून कारमधील प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक तरुणांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत, मदतकार्य करून अपघातग्रस्तांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.**

या अपघातात कारचा अक्षरशः चाकाचूर झाला. तसेच कारच्या पुढच्या नंबर प्लेटच्या जागी नंबर प्लेट ऐवजी ठाकूर अशी पाटी लावलेली होती. अपघात कशामुळे झाला?. अपघातावेळी कारमधील तरुण मद्यधुंद अवस्थेत होते का?. याचा पुढील तपास पौड पोलिसांकडून केला जात आहे, या घटनेनंतर संताप व्यक्त होत आहे. पुण्याच्या मुळशी तालुक्यात मध्यरात्री भीषण अपघात झाला आहे. या अपघातात ८ जण गंभीर जखमी झाले. मुळशी तालुक्यातील पौडजवळ मध्यरात्री भरधाव कारची उभ्या पीक अप गाडीला धडक बसून भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार रात्री उशिरा पुणे–कोलाड महामार्गावर ही घटना घडली आहे.. पौडच्या विठ्ठलवाडी फाटा परिसरात तरकारी माल घेऊन रस्त्याच्या कडेला पीक अप गाडी उभी होती. त्या गाडीला एका लाल रंगाच्या गाडीने अतिशय वेगात धडक दिली. यामध्ये कारचे मोठे नुकसान झाले असून कारमधील प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक तरुणांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत, मदतकार्य करून अपघातग्रस्तांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले या अपघातात कारचा अक्षरशः चाकाचूर झाला. तसेच कारच्या पुढच्या नंबर प्लेटच्या जागी नंबर प्लेट ऐवजी ठाकूर अशी पाटी होती. पुढील तपास पौड पोलिसांकडून केला जात आहे.

# लोणावळ्यातील कुसगाव परिसरातून मेफेड्रोन पावडर जप्त

## लोणावळ्यात पुणे पोलिसांची धडक कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे ग्रामीण पोलिसांनी अमली पदार्थ विरोधी मोहिमे अंतर्गत मोठी कारवाई करत लोणावळ्यातील कुसगाव परिसरातून मेफेड्रोन पावडर जप्त केली आहे. याप्रकरणी दोन तरुणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून एकूण २ लाख ८० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि लोणावळा ग्रामीण पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली. योगेश उर्फ सनी उर्फ गोगो दुर्योधन उमक (वय २४, रा. कुसगाव, लोणावळा), रिझवान अली नंदकुंद सिद्दीकी (वय २७, रा. कामत रूम, लोणावळा) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.**



कुसगाव येथील रेल्वेच्या मोकळ्या जागेत काही व्यक्ती अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली होती.या माहितीच्या आधारे पोलिसांनी परिसरात सापळा रचला आणि संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या दोन तरुणांना ताब्यात घेतले.पोलिसांनी टाकलेल्या छाप्या दरम्यान आरोपींकडे २६.०९ ग्रॅम वजनाची एमडी (मेफेड्रोन) पावडर सापडली,ज्याची किंमत साधारण २ लाख ६० हजार ९०० रुपये इतकी आहे. तसेच,त्यांच्याकडून २० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोनही जप्त करण्यात आले आहेत.आरोपींनी संगनमत करून बेकायदेशीर विक्री आणि सेवनाच्या उद्देशाने हे अमली पदार्थ बाळगल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर,लोणावळा ग्रामीणचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे,पोलीस उपनिरीक्षक अभिजित सावंत,हनुमंत पासलकर,सागर नामदास,तुषार भोईटे आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.याप्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

cmyk